MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
दिशा

वर्ष बाविसावे/अंक १०/ऑक्टोबर २०२१

## संपादकीय

### वैज्ञानिक संस्कृती आंतरराष्ट्रीय दिन

वर्षातील काही दिवस राष्ट्रीय, तर काही दिवस आंतरराष्ट्रीय दिन म्हणून साजरे केले जातात. जसे २८ फेब्रुवारी हा दिवस भारतात 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणून साजरा केला जातो. तर २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय 'योग दिन' म्हणून साजरा केला जातो. या मालिकेत मागील वर्षापासून आणखी एका दिवसाची भर पडली आहे. त्याला 'वैज्ञानिक संस्कृती आंतरराष्ट्रीय दिन' (International Day of Scientific Culture) असे म्हणतात. विज्ञान हे विशेष ज्ञान आहे. एका विशिष्ट पद्धतीने विचार करून या ज्ञानशाखेची निर्मिती झाली. त्याचबरोबर, या ज्ञानशाखेच्या विस्ताराने एका विशिष्ट विचारसरणीचा विकास झाला. त्यातून निर्माण झालेली संस्कृती ही वैज्ञानिक संस्कृती म्हणून ओळखली जाते. या संस्कृतीचा अवलंब करून अंधश्रद्धेचे निर्मूलन करता येते, दैनंदिन समस्यांवर तोडगा काढता येतो, तसेच जीवनाकडे बघण्याचा सम्यक दृष्टिकोन विकसित करता येतो. त्यामुळे या संस्कृतीचा समाजात प्रसार होणे आवश्यक आहे. त्यासाठीच या आंतरराष्ट्रीय दिनाची सुरुवात करण्यात आली आहे.

मेक्सिको आणि कोस्टा रिका या देशातील विज्ञान प्रसारकांनी वैज्ञानिक संस्कृती समाजात रुजविण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर वैज्ञानिक संस्कृती दिनाचे आयोजन करण्याची गरज आहे असे आग्रही प्रतिपादन केले. त्याला इतर देशांतील विज्ञान प्रसारकांनी दुजोरा दिला. या मागणीचा सांगोपांग विचार करून युनेस्कोने २०२० पासून आंतरराष्ट्रीय स्तरावर वैज्ञानिक संस्कृती दिन साजरा करावा असे सुचवले. त्यासाठी २८ सप्टेंबर ही तारीख निश्चित करण्यात आली. सप्टेंबर महिन्याच्या २८ तारखेचे औचित्य असे की, बरोबर ४० वर्षांपूर्वी याच तारखेला टेलिव्हिजनवर एक अतिशय लोकप्रिय अशा वैज्ञानिक मालिकेची सुरुवात झाली होती. त्या मालिकेचे नाव होते 'कॉस्मॉस : एक वैयक्तिक प्रवास' (Cosmos: - Personal Voyage). या मालिकेचे लेखन डॉ. कार्ल सॅगन, ॲन ड्रुयान आणि स्टिवन सॉटर (Carl Sagan, Ann Druyan and Steven Soter) यांनी केले होते. डॉ. कार्ल सॅगन हे एक नावाजलेले अमेरिकन खगोलशास्त्रज्ञ होते. खगोलशास्त्रातील संशोधनाबरोबरच ते विज्ञान प्रसाराचेही कार्य करीत असत. वैज्ञानिक दृष्टीकोन तळागाळातील लोकांमध्ये रुजला पाहिजे असे आग्रही प्रतिपादन ते करीत असत. सल्ला

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

देण्याबरोबरच काम करण्यावर त्यांचा भर होता. व्याख्याने आणि लेख यांच्यामार्फत ते समाजात वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्याचा प्रयत्न करीत असत. दूरचित्रवाणी प्रणालीचा विकास झाल्यानंतर या माध्यमातून लोकांपर्यंत विज्ञान पोहोचवावे असे त्यांना वाटले. या विचारातूनच त्यानी वर उल्लेखिलेली मालिका तयार केली. या मालिकेचे सूत्रसंचालन स्वतः कार्ल सॅगन यांनीच केले. १३ भागात बनविलेल्या या मालिकेचे दिग्दर्शन अँड्रियन मॅलोन (Adrian Malone) यांनी केले होते. अमेरिकेतील पब्लिक ब्रॉडकॉस्टिंग सर्विस (Public Broadcasting Service) या दूरचित्रवाणी वाहिनीवरून २८ सप्टेंबर ते २१ डिसेंबर १९८० या कालावधीत या मालिकेचे प्रसारण करण्यात आले होते. ही मालिका एव्हढी गाजली की, १९९० च्या दशकात तिचे पुनर्प्रसारण करण्यात आले. वेगवेगळ्या देशांतील दूरचित्रवाहिन्यांवर ही मालिका दाखविण्यात आली. तसेच वेगवेगळ्या भाषेत तिचे रूपांतर करण्यात आले. एका सर्वेक्षणात असे आढळून आले की, सुमारे ५ अब्ज लोकांनी ही मालिका पाहिली असावी.

वैज्ञानिक संस्कृती आंतरराष्ट्रीय दिनाची सुरुवात कोविड काळात व्हावी हा एक योगायोगच म्हणावा लागेल. याचे कारण या महामारीच्या काळात वैज्ञानिक संस्कृतीला फारच महत्त्व प्राप्त झाले आहे. कोविडच्या बंधनामुळे मागच्या वर्षी हा दिवस अगदी साधेपणाने आणि दूरदृश्य प्रणालीच्या मदतीने साजरा करण्यात आला. यावर्षी मात्र बंधने जरा शिथिल झाली असल्याने हा दिवस मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात आला. त्याकामी पुढाकार घेतला तो विज्ञान प्रसारकांच्या राष्ट्रीय केंद्राने (National Centre for Science Communicators). १९९० च्या दशकात मराठी विज्ञान परिषदेच्या सहकार्याने स्थापन झालेल्या या संघटनेने देशातील अनेक विज्ञान प्रसारकांना एकत्र आणले आहे. वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन ही संघटना करीत असते. वैज्ञानिक संस्कृती आंतरराष्ट्रीय दिनाच्या निमित्ताने त्यानी एका आंतरराष्ट्रीय परिषदेचे (International Conference) आयोजन केले होते. हे आयोजन म्हणजे त्यांच्यासाठी एक मोठे आव्हान होते. ते पेलण्यासाठी त्यांनी मुंबई शहरातील गुरूनानक महाविद्यालयाची मदत घेतली. या दोन संस्थानी मिळून मंगळवार दिनांक २८ सप्टेंबर २०२१ रोजी वैज्ञानिक संस्कृती या विषयावर एका उत्तम आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले. हे आयोजन मिश्र पद्धतीने केले गेले. ज्यांना शक्य होते ते सगळेजण महाविद्यालयात एकत्र आले. इतरांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून परिषदेत सहभाग घेतला.

वैज्ञानिक संस्कृती आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन फारच प्रभावीपणे करण्यात आले होते. त्यात सकाळी १०.३० ते संध्याकाळी ५.३० असा सात तासांचा भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यासाठी ब्राझील, मेक्सिको, अमेरिका, इंग्लंड, भारत, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया या देशांतील तज्ज्ञ व्यक्तींना पाचारण करण्यात आले होते. पृथ्वीच्या या वेगवेगळ्या भागात कुठे सकाळ, कुठे दुपार, तर कुठे संध्याकाळ अशी वेळ होती. त्या सगळ्यांची काळजी आयोजकांनी घेतली. विशेष हे की, वेगवेगळ्या देशांतील तज्ज्ञ व्यक्तींनी वेळेवर उपस्थित राहून कार्यक्रमाच्या आयोजनात मदत केली. आपले विचार त्यांनी मोजक्या शब्दांत पण प्रभावीपणे मांडले. कोविड काळातील बंधनामुळे फारच थोडे लोक महाविद्यालयात हजर होते. मात्र दूरदृश्य प्रणालीद्वारे मोठ्या संख्येने देशातील, तसेच विदेशातील लोक

(पृष्ठ क्र. ५ वर)



व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष बाविसावे / अंक १० / ऑक्टोबर २०२१

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २६ वे/अंक ४ था)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | आमचे उद्योगपती आजोबा | शैलजा बेडेकर | २ |
| ३) | मला भावलेले होर्मसजी जहांगीर भाभा | नरेंद्र गोळे | ६ |
| ४) | तैयारी आणि असर... | डॉ. आनंद कुलकर्णी | १० |
| ५) | ॲना बर्न्सची : मिल्कमॅन : अस्वस्थ त्रिशतकाची डायरी | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | १४ |
| ६) | प्रकाशवाटा | गौरी अनिरुद्ध गोरेगावकर | १८ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३१ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आमचे उद्योगपती आजोबा

*विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त व कला महाविद्यालयाचे प्रमुख देणगीदार कै. केशव गणेश जोशी यांचा जीवनपट या लेखात उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.- संपादक*

बाबा!

होय मुंबईचे बाबा!

आम्ही तुम्हाला म्हणजे आईच्या वडिलांना म्हणजे आजोबांना 'बाबा' म्हणूनच हाक मारायचो. तुमचा प्रेस आहे आणि त्यापेक्षा तुम्ही श्री समर्थ भक्त आहात एवढीच आम्हांला तुमची ओळख. हां कधी कधी आई तुमच्या पूर्ण आयुष्याबद्दल सांगायची; नाही असं नाही. पण ते वय म्हणजे ऐकायचं आणि सोडून द्यायचं असंच.

पण अलीकडे कसं काय कळत नाही पण एका विचाराने माझं मन सारखे बेचैन होत होत, सारखे झपाटले जात होते. के. जी. कॉलेज हे नाव कोणाचे आहे. ते कोण होते, त्याचे नाव का व कसे दिले हे त्या कॉलेज शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला माहीत आहे का? माहीत असतं का? या विचारांनी माझा अगदी पाठपुरावा केला.

मला माझ्या मनाने खडसावलं अगदी धारेवर धरून की तू आतापर्यंत मोठमोठ्या उद्योगपतींची चरित्र वाचली आहेस, वाचत आहेस, पण तुझे आजोबा बाबुराव जोशी यांचे चरित्र वाचलेस का? नाही. का नाही? कारण हेच की, अति परिचयात अवज्ञा हेच अगदी खरं आहे ते.

या विचारांनी जीव अगदी खरंच चुटपुटला.

आता काय करावं तेच कळेना. अपराधी भावनेतून जीव अगदी त्यांच्या स्मरणाने व्याकुळ होत होता. डोळ्यांपुढे तर त्यांचे वृद्धकाळाने थकलेले, सुजलेल्या पायाच्या वेदनांनी, गुडघ्याच्या दुखण्यांनी हैराण झालेले, पण तरीही कधी स्वस्थ न बसता कायम मोठ्यामोठ्या आध्यात्मिक ग्रंथाचे वाचन करण्यात, जप करण्यात मग्न असलेले बाबा डोळ्यांपुढे स्पष्ट दिसतात. बाबांचं आणखी एक रूप मला कायम आठवतं म्हणजे आंघोळ केल्यावर ते जे धोतर नेसायचे ते इस्त्री केलेले नसायचे, पण बाबा ते धोतर व्यवस्थित नेसायचे की जणू इस्त्रीच केली आहे. कपाळाला, दोन्ही दंडांना गंध लावायचे. पण ते इतके आखीव-रेखीव की कुठेही वेंधळेपणा दिसायचा नाही. आपले प्रतिबिंब पानात पाहावे इतके आरशासारखे स्वच्छ जेवलेले पान.

उंचीला बाबा काहीसे ठेंगणे, केतकी कांतीचे, डोळे घारे पण नजर विलक्षण आत्मविश्वासाच्या तेजाने चमकणारी अन् उभे व्यक्तिमत्त्व स्वकर्तृत्वाची साक्ष पटविणारे.

ऐन उमेदीतल्या त्यांच्या काळाचा आणि त्यांनी केलेल्या उद्योगाचा विचार केला तर ते एक मोठे कर्तृत्ववान आणि जिद्दी होते.

बाबांचा जन्म गोंधळे गावी १८८७ रोजी २३ नोव्हेंबर या दिवशी झाला. त्यांचे वडील गणेशपंत मुंबईला शीळा प्रेसमध्ये कामाला होते. अक्षर खूप सुंदर होते. लिखाणाची सगळी कामं त्यांच्याकडेच येत होती. पण ती उदरनिर्वाहाची मिळकत जेमतेमच होती. बाबांचे आजी-आजोबा गेल्यावर त्यांना व त्यांच्या आईला मुंबईचीच वाट धरावी लागली होती. कारण गोंधळे

संकटे टाळणे माणसाच्या हाती नसले तरी त्यांचा सामना करणे त्याच्या हाती असते.

त्यांना आधार द्यायला किंवा भिक्षुकी शिकवायला कोणी तयार नव्हते. उलट त्यांचे राहते घर लिलावात काढले गेले.

पण बाळाचे पाय पाळण्यात दिसतात म्हणतात, तसेच बाबांचे भविष्य त्यांच्या आजी-आजोबांनी ओळखलं होतं आणि त्यांनी सांगितले होते, 'बाबू तू खूप मोठा होशील. कर्तृत्वान होशील. खूप पैसा मिळवशील.'

मुंबईला आल्यावर त्यांचं शालेय शिक्षण सुरू झालं. त्यांच्या वडिलांनी त्यांच्याकडून अक्षर चांगले गिरवून वळणदार करवून घेतले व चित्रकलेलाही वळण लावले. त्याचा उपयोग त्यांना पुढच्या आयुष्यात खूप मोठ्या प्रमाणात झाला. बाबा अत्यंत तल्लख बुद्धीचे, बुद्धीमान आणि खूपच मेहनती होते. त्यांच्या वडिलांची तब्बेत तर नाजूकच होती आणि पुढे पुढे तर जास्तच नाजूक होत गेली आणि बाबांना लहान वयातच आपल्यावर येणाऱ्या जबाबदारीची पूर्ण जाणीव होती आणि म्हणूनच त्यांनी विद्येच्या विविध क्षेत्रांतले ज्ञानसंपादन करण्यास लहान वयातच सुरुवात केली होती.

बाबांचा साधना-अभ्यास पहाटे ४ पासूनच चालू व्हायचा. प्रथम भिक्षुकी पौरोहित्याचा अभ्यास. त्यात बाबांनी चांगलेच प्रावीण्य मिळविले. घर प्रपंच्याला हातभार लागावा म्हणून ते लहान वयात भिक्षुकीही करू लागले. चौथीची परीक्षा दिल्यावर मग त्यांनी संस्कृतचा अभ्यासही चालू केला आणि त्यातही आश्चर्यकारक एवढी झपाट्याने प्रगती केली की, त्यांच्या शिक्षकांनीही अतिशय आनंदानी त्यांची शाबासकी देऊन पाठ थोपटली.

अशी अभ्यास प्रगतीची घोडदौड चालू असतानाच त्यांना घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे शाळा सोडावी लागली आणि उदरनिर्वाहाकरता उद्योगधंद्याच्या मागे लागावे लागले.

त्यांच्या राहत्या खोलीजवळच एक सुंदर चित्र फ्रेम करण्याचे काम चालू होते. तिथे ते जाऊन फावल्यावेळात बसायचे आणि निरीक्षण करायचे. यातूनच देवादिकांची सुंदर चित्रे फ्रेम केलेली आणि पोथ्या पुस्तके हातगाडीवर घेऊन मुंबईत खूप लांबवर फिरून विकण्याचा धंदा चालू केला. काम सोपं नव्हतं. अक्षरशः निढळाचा घाम गळत होता. आणि लोकनिंदेचे घाव सोसावे लागत होते. पण त्यांनी कामाच्या दर्जाचा किंवा लोक अपवादाचा विचारच केला नाही. असा दोन वर्ष त्यांचा हातगाडीवरचा धंदा चालू होता. पण नंतर त्यांचेच अनुकरण बाकीचे लोक करू लागले. म्हणून मग त्यांनी तो धंदा बंद केला.

आणि मग त्यांच्या वडिलांबरोबर शिळा प्रेसमध्ये अक्षर लिहिण्याचे व डिझाइन्सची चित्र, पोथ्या, पुराण्याच्या पुस्तकावर काढून देण्याचे काम ते करू लागले. तसेच त्या काळात निघणाऱ्या नकाशात योग्य ठिकाणी गावांची नाव लिहिण्याचे कामही शिकून घेऊन ते करू लागले. त्यांच्या कामात सचोटी होती. व्यवस्थितपणा, प्रामाणिकपणा हे गुण विशेष होते. त्यामुळे अनेक प्रेसमधून त्यांना बोलावणे येई. कामाची मेहनत जास्त पण मोबदला कमी अशी परिस्थिती होती. पण इलाज नव्हता.

काम व्यवस्थित, चांगले, सुंदर केले जात असल्यामुळे खूप लोकांच्या पसंतीला येत होते आणि पुष्कळ प्रेसमधून बाबांना बोलावणे येत होते. पण अनेक ठिकाणी कामाला जाण्यापेक्षा एकाच ठिकाणी चांगले काम करणे फायद्याचे आहे असा विचार करून त्यांनी एकाच प्रेसमध्ये काम करण्याचे ठरवले. ह्या वेळेपर्यंत त्यांनी लिथोवरच्या सगळ्या कामाचे बारकावे शिकून घेतले होते.

शहाणा माणूस चुका विसरतो; पण त्याची कारणे नाहीत.

सिटीलिथोच्या मालकांनी बाबांच्या कामाची चांगली पारख केली होती. त्यांनी त्याच्या अंगचे गुण ओळखूनच कामावर बोलावलं होतं. पण काही दिवसातच त्यांनी बाबांकडून दहा वर्षांचा करार करून मागितला. तेव्हा मात्र बाबांचा स्वाभिमान दुखावला. मी कोणाचा गुलाम होणार नाही म्हणून त्यांनी कामाचा राजीनामा दिला.

आता पुन्हा प्रश्न उभा राहिला, पुढे काय?

तसे ते काही स्वस्थ बसलेले नव्हतेच. घरी फावल्या वेळात फ्रेम तयार करण्याचे काम चालू होतेच. तसेच रात्री चाळीचाळीं मधून वृद्ध लोकांना रामायण, पांडवप्रताप, हरिविजय हे ग्रंथ वाचून दाखवायचे. त्यामुळे त्यांना तांदूळ, नारळ, फळे यांची मिळकत होत होती. तसेच ते सत्यनारायण वगैरे पूजा सांगायला जात.

तरी पण वडिलांच्या औषधाला पैसे लागत, घर पण चालवायला पैसे लागत, ते मिळवणे आवश्यक होतेच. स्वतःच्या पायावर उभं राहाणं अत्यंत गरजेचं होत. पण काय करावं? कुठे जावे? या प्रश्नाच्या भोवऱ्यात सुटका होत नव्हती. एक मार्ग दिसत होता, पण एवढे मोठे आवाहन स्वीकारावे का? आपली पैशाची बाजू लंगडी आहे. आपण भांडवल उभं करू शकू का? अशा अनेक विचाऱ्यांच्या भोवऱ्यात ते सापडले होते. ना कोणी मार्गदर्शन करणारे भेटले, ना सल्ला देणारे भेटले. उलट त्यांचा तेजोभंग व मनोभंग केला जात होता. त्यांना ना उमेद दिली जात होती. मदतीचा हात सहकार्याचा हात द्यायला कोणीही पुढे येत नव्हते. उलट तुझी ही अति उत्साही महत्त्वाकांक्षा सोडून दे नाहीतर पस्तावशील असे सांगितले जात होते. पण त्यांनी आपली जिद्द सोडली नाही. आपला आत्मविश्वास सोडला नाही.

मी वाटेल ते कष्ट करीन पण गुलाम होणार नाही. स्वतःच्या पायावर उभा राहीन. त्याच्या वडिलांना आपल्या मुलाची धडपड, तळमळ दिसत होती, कळत होती.

बाबांनी आपला विचार वडिलांना सांगितला. खरं म्हणजे पोटदुखीने ते पण आजारीच होते. पण त्यांनी बाबांच्या विचाराला परवानगी दिली.

त्या वेळेला माटुंग्याला ज्ञानसागर नावाचा लिथो प्रेस बंद पडला होता. तोच भाडेतत्त्वावर बाबांनी मागितला आणि त्याच्या मालकानी काही अटींवर चालवायला दिलाही. जणू तो त्यांच्याच नशिबात लिहिला होता. खरं तर त्याच्याकरता काही भांडवलाची गरज होती. पण, 'ही तुझी राक्षसी महत्त्वाकांक्षा आहे. ती सोडून दे' अशा शब्दात त्याचं खच्चीकरण केलं. पण बाबा खचले नाहीत. त्यांनी आपल्या मनगटावरच्या आत्मविश्वासाने १९०७ साली प्रथम लहान स्वरूपात प्रेस चालू केला. चार ठिकाणी पायी हिंडून कामे मिळवली. त्या वेळेला बाबाच मालक आणि तेच नोकर. तेव्हा त्यांचं वय अवघे १८ वर्ष होते. हेच एक फार मोठं आश्चर्य होतं आणि कामातील सुबकता, सुंदरता, वक्तशीरपणा, प्रामाणिकपणा, सांगितल्या वेळेत माल पुरा करून देण्याची जागरुकता, तत्परता या सर्व गुणांमुळे त्याच्यावरील लोकांचा विश्वास वाढला आणि त्यांना भरभर कामं मिळू लागली. कामं आपणहून त्यांच्याकडे चालून येऊ लागली. मग त्यांनी आपल्या मदतीकरता चार नोकर ठेवले आणि वर्षभरात बिन भांडवली धंद्याचा चांगला जम बसवला आणि चाराचे चारशे कामगार प्रेसमध्ये काम करू लागले.

जसे जसे कामाचे स्वरूप वेगवेगळ्या प्रकारे वाढू लागले. तसं तसं त्यांनी आवश्यक ती छपाईची मशीन कर्ज काढून घेण्यास सुरुवात केली.

त्याकरता त्यांना ऐका छोट्या जागेतून मोठ्या जागेत स्थलांतर करावे लागत होते. आणि मग त्यांनी स्वतःच्या हिमतीवर प्रचंड मोठे धाडशी पाऊल टाकले

ते म्हणजे त्यावेळी हिंदुस्थानात कुठल्याही प्रेसमध्ये नव्हती अशी मशिन्स इंग्लंड, जर्मनी मधून मागवली. एवढेच नाही तर, ते बसवण्याकरता लागणारे इंजिनीयर्सही योग्य तो पगार देऊन तेथूनच मागवले. आणि त्या मशीनवर काम कसे करावे ते दाखवणारा माणूसही तेथूनच बोलावला. पहिल्यापासून ज्ञानसागरच्या मालाला मागणी होतीच ती आणखी वाढली. ज्यांनी प्रथम त्यांना भांडवल नाकारले होते तेच आता आपण होऊन पुढे येत होते.

त्यावेळेचे पुढारी नेते मंडळीही कामाकरता ज्ञानसागरकडे येऊ लागली. आणि आजूबाजूचे लोक आश्चर्याने बाबांकडे पाहू लागले की, हातगाडी चालवणारा, भिक्षुकी करणारा एक मुलगा आज कुठे पोहोचला. त्याच्या कामातून त्यांना प्रयत्नांती परमेश्वर दिसला होता.

अशात जेवढा व्याप तेवढाच संताप हे ठरलेलंच आहे. कामगारांचा संप, काम सोडून जाणे, टाळेबंदी हे अनुभव येतच होते. पण त्यातूनही ते तावूनसुलाखून परिश्रमाच्या घामातून त्यांनी मोती काढले होते. उद्योगाच्या घरी लक्ष्मीचा आनंद दिसत होता आणि यातच बाबांना श्री समर्थ रामदासांचा कृपा प्रसाद लाभला होता. शुभ आशीर्वाद लाभला होता. ते लहानपणापासून परमेश्वराचे भक्त उपासक होतेच. परमेश्वरावर त्यांची अनन्य श्रद्धा होतीच आणि त्यातूनच श्री समर्थ उपासना आपणहून त्यांच्याकडे चालत आली. प्रेसचे काम संपल्यावर रोज ते काळाराम मंदिरात प्रवचनाला जात. तिथल्या पाटणकर बुवांनी बाबांच्या हातात दासबोध दिला आणि सांगितलं की, हा नित्य वाचनात ठेवा, तुमची संकट दूर होतील आणि बाबांना त्याची प्रचीती पण मिळत असे.

असे हे बाबा म्हणजे आमचे आजोबा. म्हणजेच आईचे वडील.

जितके मानाचे करारी तितकेच हळवे आणि अति प्रेमळ. त्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहण्याकरता सोसलेले हालअपेष्टा, कष्ट मान-अपमानाचे घाव सोसल्याशिवाय जसे देवपण सिद्ध होत नाही, तसेच अवघड परिस्थितीचे चटके सोसूनच बाबांमधला एक महान उद्योगपती सिद्ध झाला.

त्यांच्या अथक कष्टाला, दिसणाऱ्या देवत्वाला माझे भक्तीभावाने वंदन! आणि लाख लाख प्रणाम.

**– शैलजा वासुदेव बेडेकर**
ठाणे

•••

---

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय**)

या परिषदेत सहभागी झाले होते. वैज्ञानिक संकृतीच्या विविध घटकांवर या परिषदेत प्रकाश टाकण्यात आला. आपल्या घरच्या दिवाणखान्यात बसून एकाच वेळी अनेक देशांतील तज्ज्ञांचे विचार ऐकता आले. दूरदृश्य प्रणालीचा विकास ही कोविड काळाची देणगीच आहे असे म्हणायला हरकत नाही.

वैज्ञानिक संस्कृती आंतरराष्ट्रीय दिनाचे हे दुसरेच वर्ष होते. त्याचा उपयोग करून मुंबई शहरात एका आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. यातून प्रेरणा घेऊन देशातील इतर संघटना पुढे येतील अशी आशा बाळगू या. विज्ञान प्रसारकांचे राष्ट्रीय केंद्र आणि गुरूनानक महाविद्यालय यानी पुढच्या वर्षी हा दिवस मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याचा निर्धार केलाच आहे. या कामात देशातील इतर संस्थांनी सहकार्य करण्याची गरज आहे. असे झाले तरच वैज्ञानिक संस्कृती आपल्या समाजात रुजायला मदत होईल.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

# मला भावलेले होर्मसजी जहांगीर भाभा

*होमी भाभा यांना आपण सर्वच 'भारताच्या अणुऊर्जेचे जनक' म्हणून ओळखतो. मात्र याव्यतिरिक्त होमी भाभा एक उत्तम नेते होते, एक उत्तम कलाकार होते, उत्कृष्ट पर्यावरणवादी होते, द्रष्टे होते, देशभक्त होते, याचे काही पुरावेच लेखकाने इथे सादर केले आहे.– संपादक*



**(जन्म : ३० ऑक्टोंबर १९०९, मुंबई**
**मृत्यू : २४ जानेवारी १९६६, माऊंट ब्लांक)**

शास्त्राभ्यास करे, कलेत विहरे, नेतृत्व देई पुरे
बांधे संघटना, जनांत विचरे, चित्रांत व्यक्ती भरे ।
ठेवी देश पुढे, नवे घडवी जो, शास्त्रज्ञ देशातले
भाभा होर्मसजी, महान जगती, आदर्श ठेवीतसे ।।

**होमी भाभा एक उत्तम नेते**

भारतातील अवकाशविज्ञानसंशोधनाचे जनक विक्रम साराभाई म्हणाले (२) की, 'या अणुऊर्जा विभागातच नाही, तर असंख्य शास्त्रज्ञांत आणि विद्यापीठांतून अणुऊर्जा प्रशालेत येणाऱ्या तरुणांत, जो आत्मविश्वास आणि प्रेरणा भाभा निर्माण करू शकत, ज्या प्रकारे त्यांना निरंतर आधार देत असत, तोच खरा त्यांनी आपल्याकरता मागे ठेवलेला वारसा आहे.'

होमी भाभांनी केंब्रीज विद्यापीठाच्या कैस महाविद्यालयातून १९२७ साली यांत्रिकी अभियंत्रज्ञ पदवी प्राप्त केली होती. व्यावसायिक म्हणून ते प्रशिक्षित अभियंते होते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील भौतिकशास्त्रज्ञ होते. टाटा मूलभूत संशोधन संस्थेचे संस्थापक संचालक होते. त्यांना भारतीय आण्विक कार्यक्रमाचे जनक म्हणवले जात असे. 'ऍटोमिक एनर्जी एस्टॅब्लिशमेंट ट्रॉम्बे'चे संस्थापक संचालक होते. त्यांचे पश्चात या संस्थेस त्यांचे नाव देण्यात आले. ती 'भाभा अणुसंशोधन संस्था', झाली. या दोन संस्था म्हणजे भारतीय अण्वस्त्रविकासाच्या कोनशीलाच आहेत.

**होमी भाभा उत्तम कलाकार होते**

केंब्रीजमध्ये असताना होमी भाभांनी काल्ड्रॉन ह्यांच्या 'लाईफ इज अ ड्रीम', हँडेल ह्यांच्या 'सुस्सान्ह' आणि मोझार्ट ह्यांच्या 'ईडोमेनो' या ऑपेरांचे नेपथ्य केले होते (३).

ते तेवढ्याच वकूबाचे चित्रकारही होते. संगीत रसिक होते. कलाप्रेमी होते. कलेला आश्रय देणारे थोर व्यक्ती होते. अभिजात कलांप्रती त्यांना लहानपणापासून प्रेम होते. संगीत आणि संस्कृतीच्या वातावरणात ते वाढले. त्यांच्या कुटुंबाचा पुस्तकसंग्रह वैभवशाली होता. त्यात कला आणि संगीतावरील खूप पुस्तके होती. पाश्चात्त्य अभिजात संगीताच्या तबकड्यांचाही त्यांचेकडे संग्रह होता. त्यांना चित्रकला आणि रेखाकलेत रुची व गतीही होती. शाळेत असताना विख्यात पारशी कलाकार जहांगीर लालकाका ह्यांचेकडे ते चित्रकलेचे धडे गिरवत असत. 'बॉम्बे आर्ट सोसायटीच्या' अनेक वार्षिकोत्सवांतून त्यांनी कलेकरताची पारितोषिके प्राप्त केली होती.

होमी भाभा उत्तम रेखाचित्रे काढत असत. आम्ही आमच्या उमेदवारीच्या काळात ज्या प्रशिक्षणशाळेच्या वसतीगृहात राहत होतो, त्याच्या चौदाव्या मजल्यावरील उपाहारगृहातील चारही भिंतींवर त्यांच्या रेखाचित्रांच्या चौकटी विद्यमान आहेत. भारतातील उत्तम चित्रकार मक्बूल फिदा हुसेन ह्यांचेही एक उत्तम रेखाचित्र भाभा ह्यांनी काढलेले आहे.

**होमी भाभा उत्कृष्ट पर्यावरणवादी (४) होते**

भाभांना झाडे आणि फुले ह्यांबाबत एक विशेषच आकर्षण होते. दिखावू वृक्षारोपण समारोहांपासून ते स्वतःला वेगळेच ठेवत असत. टाटा मूलभूत विज्ञान संस्थेची उभारणी होत असताना, सुमारे २५ प्रचंड असे वड आणि पिंपळाचे वृक्ष कापावे लागणार होते. ते त्यांनी उचलून इतरत्र लावले होते. याच संस्थेत नेपिअन-सी-रोड वरून उचलून आणलेले दोन वृक्षही आहेत. एक आहे ३० फुटी पांढरा चाफा आणि एक आहे ३५ फुटी बुचाचे झाड. असेच एकदा त्यांनी पेडर रोडच्या पदपथावर महापालिकेच्या लोकांना पर्जन्यवृक्ष तोडण्याच्या तयारीत असलेले पाहिले. त्यांना फार दुःख झाले. ट्रॉम्बेला परतताच त्यांनी तो वृक्ष तोडण्यापूर्वीच रु.३०/- देऊन विकत घेतला आणि केनिलवर्थ इमारतीच्या आवारात लावला. ट्रॉम्बेमध्ये अशाचप्रकारे त्यांनी वाचवलेले सुमारे १०० वृक्ष आहेत.

मला आठवते. भाभा अणुसंशोधन केंद्रात 'मॉड्युलर लॅबोरेटरी' नावाची पाऊण किलोमीटर लांबीची लांबलचक इमारत आहे, तिच्या पाठीमागे स्टेट बँकेपाशी पिंपळ आहे, नंतर ओळीनी दहा प्रचंड वटवृक्ष आहेत, शेवटास एक उंबरही आहे. या वटवृक्षातील एक वृक्ष कृष्णवट आहे. असे ऐकून आहे की, हे सारे वृक्ष असेच मरणाच्या दारातून परत आणलेले आहेत. आज त्यांचे वय संस्थेच्या वयाहूनही अधिक आहे आणि त्यांच्या आशीर्वादानेच संस्था विकास साधत आहे. येथील शास्त्रज्ञांच्या, सर्व भारतीयांना अभिमानास्पद वाटेल अशा कामगिरीचे ते मूक साक्षीदार आहेत.

**होमी भाभा द्रष्टे (५) होते**

१९४८ साली जेव्हा भारतीय अणुऊर्जा आयोगाची स्थापना झाली आणि भाभा त्या आयोगाचे संस्थापक अध्यक्ष झाले तेव्हा भाभा म्हणाले होते की, 'पुढील दोन दशकांत अणुऊर्जा देशातील अर्थव्यवस्थेत आणि उद्योगांत महत्त्वाची भूमिका पार पाडणार आहे. औद्योगिकदृष्ट्या आधीच विकसित असलेल्या राष्ट्रांहून भारतास मागे राहायचे नसेल तर अणुऊर्जेचा विकास अधिक ऊर्जस्वलतेने करावा लागेल.'

तसा तो विकास आपण घडवलाही. त्यामुळेच १९७४ व १९९८च्या अणुचाचण्या यशस्वी करून आपण अण्वस्त्रसज्ज देश होऊ शकलो. याबाबतीत सर्व जगात आपण घेतलेली आघाडी हा त्यांच्या दूरदृष्टीचाच परिपाक आहे. अणुऊर्जा आणि अवकाश संशोधन या दोन्हींतही भारताने आज जी नेत्रदीपक प्रगती केलेली आहे ते त्यांच्या दूरदृष्टीचेच फलित आहे.

**होमी भाभा देशभक्त होते**

होमी भाभांनी विश्वकिरणांच्या वर्षावांवर मोलाचे संशोधन केले होते. ते ब्रिटनमध्ये राहूही शकले असते. तिथे त्यांना सन्मानही मिळाला असता. मात्र, पुरेसा सन्मान आणि आर्थिक पाठबळ मिळत असेल तर देशातच राहून, इतर सुदैवी देशांत असलेल्या शैक्षणिक संस्थांच्या तुल्यबळ संस्था आपल्या देशातच उभ्या करणे हे आपले कर्तव्य आहे असे त्यांचे मत होते (६). टाटा मूलभूत विज्ञान संस्था, ॲटॉमिक एनर्जी एस्टॅब्लिशमेंट ट्रॉम्बे (ए.ई.ई.टी., भाभांच्या अपघाती मृत्यूनंतर याच संस्थेचे नामकरण भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले) आणि त्याची प्रशिक्षण



भाभांचे एक अमूर्तचित्र
(ऍब्स्ट्रॅक्ट पेंटिंग)




ऍटोमिक एनर्जी एस्टॅब्लिशमेंट. हिचेच नाव पुढे भाभा अणुसंशोधन केंद्र असे झाले. तशाच व्ही-आकारांच्या स्तंभांवर उभी असलेली मॉड्युलर लॅबोरेटरी



प्रसिद्ध चित्रकार मक्बूल फिदा हुसेन



विख्यात शास्त्रज्ञ चंद्रशेखर व्यंकट रमण



भाभा १७ वर्षांचे असतांनाचे स्वतःचेच रेखाचित्र



विख्यात शास्त्रज्ञ नील्स बोहर

भीतीमधून काळजी निर्माण होते; आणि काळजीने ग्रासले की समाधान अंतर्धान पावते.

शाळा, या भारताच्या संशोधनक्षेत्रावर चिरकाल राहणारा ठसा उमटविणाऱ्या संस्था त्यांनीच स्थापन केल्या. १९५४ साली पद्मभूषण हा नागरी सन्मान देऊन त्यांच्या या कार्याचा गौरवही करण्यात आला.

अणुऊर्जेच्या क्षेत्रात भारतास भाभांनी आजवर अग्रेसर ठेवले आहे. शिक्षणाकरता परदेशात गेल्यावर, परदेशातच न राहता जाणीवपूर्वक देशात परतून, देशाकरता एवढी देदिप्यमान कामगिरी करणारे होमी भाभा, कोणत्याही मोजपट्टीने निस्सीम देशभक्तच म्हणावे लागतील!

**थोर स्फूर्तीदात्याची अनपेक्षित अखेर**

१९६६ मध्ये भाभा असे म्हणाले होते की (७), भारत येत्या १८ महिन्यांतच अणुस्फोटके तयार करेल. त्यानंतर सुमारे तीन महिन्यांनी, ते २४ जानेवारी १९६६ रोजी सकाळी ७ वाजून २ मिनिटांनी, आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा अडतीच्या (इंटरनॅशनल ऍटोमिक एनर्जी एजन्सीच्या) शास्त्रीय सल्लागार समितीच्या बैठकीसाठी ऑस्ट्रियातील व्हिएन्ना येथे, एअर इंडियाच्या १०१ क्रमांकाच्या मुंबई ते न्यूयॉर्क उड्डाणातून, कांचनगंगा नावाच्या बोईंग-७०७ विमानाने जात होते. तेव्हा आल्प्स पर्वतातील माँट ब्लांक शिखरानजीक, त्या विमानाचा चालक आणि जिनेव्हा विमानतळ ह्यांच्यात विमानाच्या स्थितीबाबत गैरसमज निर्माण झाला. त्यामुळे अपघात होऊन विमानातील सर्वच्या सर्व ११७ लोक मृत्यू पावले. दुर्दैवाने त्यातच होमी भाभांचा मृत्यू झाला.

आज होमी भाभांना ओळखत नाही असा भारतीय विरळाच असेल. उण्यापुऱ्या ५७ वर्षांच्या आयुष्यात देशास अण्वस्त्रसज्जतेप्रत नेणाऱ्या अनेक संघटना व व्यक्ती उभ्या करणाऱ्या या द्रष्ट्या नेत्यास सादर प्रणाम.

थोर महात्मे होऊन गेले चरित्र त्यांचे पहा जरा ।
आपण त्यांच्या समान व्हावे हाच सापडे बोध खरा ।।

**संदर्भ**


१ होमी जहांगीर भाभा http://nvgole.blogspot.com/2011/10/blog-postš30.html

२ द व्हिजन अँड द व्हिजनरी https://www.icts. res.in/sites/default/files/The-Vision-and-the-Visionary.pdf

३ जहांगिर निकल्सन आर्ट फौंडेशनचे संकेतस्थळ http://jnaf.org/artist/homi-bhabha/

४ होमी भाभा- फादर ऑफ न्यूक्लिअर सायन्स इन इंडिया, आर.पी.कुलकर्णी अँड व्ही.शर्मा, बॉम्बे पॉप्युलर प्रकाशन, १९६९.

५ सागा ऑफ ऍटोमिक एनर्जी इन इंडिया कॉमेमोरेटिव्ह व्हॉल्यूम्स या संग्रहातील भाभा ह्यांचे उद्धृत. हे संग्रह भाभा अणुसंशोधन केंद्राच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

६ होर्मसजी जहांगीर भाभा https://anuvad-ranjan.blogspot.com/2012/04/blog-postš13.html

७ घातपात की अपघात? नीरा मुजूमदार, द प्रिंट, २४ जानेवारी २०१८ https://theprint.in/report/the-theories-india-nuclear-energy-pioneer-homi-bhabha/31233/



**– नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com


•••

# तैयारी आणि असर...

**(भाग १)**

*तैयारी आणि असर यांचा परस्परांशी काय संबंध आहे? ते एकमेकांना पूरक आहेत का? याबद्दल विश्लेषण या लेखात केले आहे - संपादक*

हे दोन्ही शब्द आधी आपण समजून घेऊ. तैयारी म्हणजे एखादी गोष्ट करण्याची क्षमता किंवा गुणवत्ता मिळवणे. प्रभुत्व किंवा प्राविण्य असंही म्हणता येईल. असर म्हणजे एखाद्या गोष्टीचा परिणाम, प्रभाव.

हे शब्द जास्त करून ललित/प्रायोगिक कलेच्या बाबतीत वापरले जातात. उदाहरणार्थ, संगीत. संगीतात शिक्षण असतं म्हणजे पदवी असते, तसंच प्रशिक्षण असतं. तुम्ही जे शिकताय ते अधिक परिपूर्ण होण्यासाठी तुमचे गुरू किंवा मार्गदर्शक तुम्हाला प्रशिक्षण देतात. असं शिक्षण-प्रशिक्षण झाल्यावर तुम्ही संगीतात पारंगत झाला आहात असं मानलं जातं. प्राविण्य मिळवल्यावर संगीत प्रत्यक्ष लोकांसमोर सादर करायचं असतं आणि अशा सादरीकरणात असर म्हणजे तुमच्या कलेचा श्रोत्यांवर झालेला परिणाम कळतो. तैयारी जेवढी जास्त तेवढा असर जास्त असं सर्व साधारणपणे मानलं जातं.

हे शब्द आणि त्यांचा उपयोग याविषयी समजून घेतल्यावर आपण मुख्य मुद्याकडे येऊ. तर मुद्दा हा की, तैयारी आणि असर यांचा परस्परांशी काय संबंध आहे? ते एकमेकांना पूरक आहेत का? म्हणजे तैयारी असेल तर असर होतो का? काही वेळा तैयारी नसतानाही असर होतो, असं का? संगीतात खूप वेळा असं असतं की, एखाद्या गायक/वादकाची खूप तैयारी असते पण श्रोत्यांवर त्याचा असर होत नाही. त्याउलट जुजबी तैयारी असलेला/ली कलाकार असर सोडून जातो/ते. शास्त्र किंवा क्राफ्ट काय सांगतं आणि लोकांना काय हवं असतं यातला फरक आहे का हा? असू शकतं. तैयारी- क्राफ्ट एका बाजूला आणि असर-प्रभाव दुसऱ्या बाजूला असं होत असावं. लोकप्रिय संगीताच्या बाबतीत सांगायचं तर किशोर कुमार आणि मन्ना डे ह्यांचं उदाहरण घेता येईल. किशोर कुमारने संगीताची कोणतीही औपचारिक तालीम घेतली नव्हती आणि मन्ना डे भेंडीबाजार घराण्याचे गायक होते. या दोघांत मन्ना डे यांच्याकडे तैयारी अधिक होती. पण असर मात्र किशोर कुमारचा जास्त होता. गुणवत्ता, प्राविण्य याबतीत मन्ना डे श्रेष्ठच, पण लोकांवरील प्रभाव मात्र किशोर कुमारचा अधिक होता. म्हणजे लोकप्रियता, तैयारी आणि असर या दोन्हींच्या मधे कुठेतरी येतं असली पाहिजे. व्यवहाराचा विचार केला तर ज्याचा असर आहे त्याचं मार्केटिंग होत आणि खपही होतो. याच्यापेक्षा अगदी वेगळं उदाहरण म्हणजे भारतरत्न स्वरभास्कर पं. भीमसेन जोशी यांचं. प्रचंड तैयारी आणि प्रचंड असर. आयुष्यभराच्या साधनेतून आलेलं अतुलनीय प्राविण्य आणि श्रोत्यांवर पडलेला सखोल प्रभाव दोन्हीही सारखंच. त्यांची विक्रीचे रेकॉर्डब्रेक करणारी अभंगवाणी हा त्यांच्या प्रभावाचा पुरावाच. कधी कधी असं असतं की, काहीही न कळून सुद्धा असर होतो. याचं एक उदाहरण म्हणजे जगजीत सिंग यांचं गझल गायन. यांत जगजीत सिंग यांनी खूप रियाझ करून प्राविण्य मिळवलेलं आहेच, पण आपल्या पेशकश मधून त्यांनी श्रोत्यांवर असरही केलेला आहे. कतील शिफाई या शायरची 'अपनी हाथों कि लकीरों में बसा लें मुझको/मैं हूँ तेरा तो नसीब अपना बना लें मुझको' ही गझल जगजीत सिंग अशा अंदाजमध्ये सादर करतात की' श्रोते त्या शायराना अंदाज आणि

सुरांच्या मिठास मध्ये हरवून जातात. विशेष म्हणजे अनेक श्रोत्यांना ना गझल कळलेली असते ना जगजीत सिंगानी त्यात सुरांची केलेली मांडणी कळलेली असते. पण श्रोत्यांवर असर होतो आणि तो खूप काळ टिकून राहतो. याचा अर्थ तैयारी आणि असर यांच्यामधील संबंध सरळ नाही आणि ते साधं समीकरण नाही. गुंतागुंत आहे सगळी. कलेच्या इतर क्षेत्रांतील अनेक उदाहरणं हेच सांगतील की, तैयारी आणि असर याचा एकास एक संबंध नाही. दादा कोंडके आणि अशोक सराफ यांच्याकडे अभिनयाची कोणतीही औपचारिक पदवी नव्हती आणि त्यांना विनोदाचं कोणतंही शास्त्र अवगत नव्हतं. पण अचूक टाईमिंगवर केलेला मर्मभेदक विनोद ह्यात दोघांचाही हातखंडा होता. कोणत्याही रीतसर शिक्षण घेतलेल्या आणि क्राफ्ट जाणणाऱ्या अभिनेत्यापेक्षा दादा आणि अशोक मामा तुफानी असरदार होते/आहेत.

हे दोन शब्द शिक्षण क्षेत्रातील अध्यापनाला लावून बघितले तर काय होईल? रीतसर शिक्षण घेऊन पदवी मिळवलेला शिक्षक वर्गात शिकवताना मुलांवर प्रभाव टाकतो? म्हणजे शिक्षकाचं त्याच्या विषयातलं प्रावीण्य त्याला प्रभावी शिक्षक बनवतं? इथेही उदाहरणं उलट-सुलट आहेत. म्हणजे तैयारी आणि असर यातील संबंध व्यस्त. शिकवणं हे कौशल्य आहे असं म्हणतात. पण मला ते अर्धसत्य वाटतं. कौशल्य म्हणजे एकाअर्थी क्राफ्ट. इंग्रजीत दोन शब्द आहेत- क्राफ्ट आणि आर्ट. क्राफ्ट म्हणजे प्रशिक्षण आणि अनुभवातून आलेलं कौशल्य. त्यात सराव असतो, सातत्य असतं, तसंच डिजाईन असतं. क्राफ्ट इंद्रिय गोचर असतं. म्हणजे क्राफ्ट आपण डोळ्यांनी बघू शकतो, हात लावून अनुभवू शकतो. आता शिकवणं क्राफ्ट आहे असं म्हणायचं तर त्यात हे सगळं आलं. म्हणजे आपण काय शिकवायचं हे ठरवतो, कधी शिकवायचं हे ठरवतो आणि कोणाला शिकवायचं हे ठरवतो. टिचिंग युनिट्स ठरलेले, क्लास ठरलेला आणि वेळ ठरलेली. यात कर्तव्याची भावना असते आणि व्यावसायिकताही असते. शिकवण्यामुळे विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या गुणांच्या रूपात इंद्रिय गोचरताही असते. पण एवढ्याने शिकवणं प्रभावी कसं होईल? ही सगळी तैयारी झाली, असर कुठे आहे? शिकवण्यात असर क्राफ्टने येतं नाही तर आर्टने येतो. म्हणजे क्राफ्ट लागतोच बरं का. पदवी, विषयातलं प्रावीण्य लागतंच. पण असर के लिये आर्ट चाहिये. आर्ट म्हणजे काय? भावना, कल्पकता, संवेदनशीलता आणि सौंदर्यदृष्टी. हे सगळं असलं की क्राफ्ट आर्ट होतं. आर्ट म्हणजे संकुचितपणातून, साचेबद्धपणातून मुक्तता. त्यात इंद्रिय गोचरता फार कमी असते. म्हणजे आर्ट मध्ये सगळ्या गोष्टी डोळ्यांना दिसतात, कानाला ऐकू येतात किंवा जीभेला जाणवतात असं नाही. आनंद आणि सौंदर्य अशा गोष्टी आपल्या इंद्रियांना जाणवत नाहीत पण मनाला जाणवतात. आपल्यासाठी पेढा गोड असतो, बाळाचं हसणं गोड असतं आणि एखाद्याचा आवाज गोड असतो. बोलणं गोड असतं आणि आइस्क्रीमही गोड असतं. पण यातली गोडी ही जीभेची संवेदना सगळीकडे जशीच्या तशी लागू होत नाही. त्यात गुणात्मक फरक आहे. पेढा गोड असणं हा क्राफ्ट आहे. कारण पदार्थात कौशल्य ओतून चव आणलेली असते. बाळाचं हसणं गोड व्हायला बाळच व्हावं लागतं. त्यासाठी कोणत्याही क्राफ्टचा उपयोग होत नाही. आणि बाळाला आपलं हसणं गोड आहे ह्याची जाणीव नसते. ती ज्यादिवशी होईल त्यादिवशी त्याच्या हसण्यातला गोडवा संपतो. एखाद्याचा आवाज गोड असणं हे आपल्या कानांना जाणवेलही, पण सगळ्याच गोड आवाजांचा आपल्यावर असर होत नाही. यात क्राफ्ट आहेच, पण असर व्हायला आर्ट असावं लागतं. शिकवताना हाती असलेल्या आशयाला, अनुभवाला मुक्तपणे स्वीकारायचं असतं. त्याचे अनेक अर्थ, अनेक विभ्रम स्वीकारून

आनंद घ्यायचा आणि द्यायचा असतो. शिक्षकाला असं क्राफ्टकडून आर्टकडे जाता यायला हवं. शिकवत असलेल्या घटकाशी एकरूप होऊन, त्यातील अनेकपदरी धागे पकडून मुलांवर असर निर्माण करता यायला हवा. सुसंगत उदाहरणं घेऊन, संवेदनशीलपणे आशयाचे पदर उलगडत नेले तर वर्गावर असर होणारच. पण कसं शिकवायचं आणि का शिकवायचं हे कळल्याशिवाय शिक्षकाला क्राफ्टकडून आर्टकडे जाता येत नाही. केवळ डिजाईन असून चालत नाही, व्हिजन असावी लागते आणि ती आर्ट मधूनच येते. म्हणजे तैयारी आपण सगळेच करू शकतो, पण असर कसा साधायचा हे ज्याचं त्यानं शोधून काढायचं असतं आणि ते अनुभव, कल्पकता आणि नावीन्य यातून साध्य होऊ शकतं. शिकवणं ही गोष्ट मुलांच्या मानसिकतेचा, क्षमतेचा, पार्श्वभूमीचा आणि त्यांना असलेल्या एक्स्पोजरचा विचार करून घडायला पाहिजे. मग ती एक कोरडी, औपचारिक कृती उरत नाही तर एक आनंददायी अनुभव होते. आनंददायी शिक्षण असा काहीतरी प्रकार मी ऐकलाय. तो उपयुक्त असेलही. पण माझ्यामते शिक्षण आनंददायी होण्यासाठी शिकवणं आनंददायी व्हायला हवं. आणि ते क्राफ्टकडून आर्टकडे गेल्यावरच होईल.

शिकवताना बरेच वेळा तैयारी आणि असर किंवा क्राफ्ट आणि आर्ट यांतील तोल सांभाळला जात नाही. कधी तैयारीचं पारडं जड असतं, तर कधी असर जास्त असतो. म्हणजे एखादा/दी शिक्षक/शिक्षिका छान शिकवतो/ते असं विद्यार्थी म्हणतात तेव्हा त्याचा अर्थ त्या शिक्षकाने तैयारी आणि असर यांत समतोल साधलाय असा होतो. पण हे काही दरवेळी खरं नसतं. आपण जर विद्यार्थ्यांना शिकवलेल्या घटकांविषयी विचारलं तर त्यांच्या प्रतिसादावरून त्यांना तो घटक कळलेला नाही असं आपल्या लक्षात येतं. म्हणजे इथे फक्त शिक्षकाचा असर झाला आहे; त्याची/तिची तैयारी नव्हती. काही शिक्षकांशी त्यांच्या विषयावर बोलल्यावर त्यांची खूप चांगली तैयारी आहे असं आपल्या लक्षात येतं. पण वर्गात अशा शिक्षकांचा मुलांवर असर झालाय असं आढळत नाही. काही शिक्षक असे असतात की, ज्यांच्याकडे हे दोन्हीही सारख्याच प्रमाणात असतं. म्हणजे त्यांनी तैयारी आणि असर, क्राफ्ट आणि आर्ट यांचा सुरेख मेळ घातलेला असतो. त्यांना जे शिकवायचंय ते नीट कळलेलं असतं आणि त्यातील सौंदर्याच्या आणि आनंदाच्या जागा त्यांना शोधता येतात. ह्या शोधलेल्या जागा मग त्यांना वर्गात जाऊन विद्यार्थ्यांसोबत शेअर करता येतात. ह्या जागा सापडणं हेच आर्ट आहे, हाच सौंदर्यबोध आहे. हा सौंदर्यबोध शिक्षक त्यांच्या मुलांशी जितक्या उत्कटतेने आणि तन्मयतेने वाटून घेतील तितका त्यांचा असर जास्त होईल.

सौंदर्यबोधाविषयी अनेक विचारवंतांनी, अनेक संकल्पना मांडल्या आहेत. मला इथे सौंदर्यबोधासंबंधी ॲरिस्टॉटलच्या मताची आठवण होते. त्याच्या मते सौंदर्य रचनेत असतं. आता हे काहीअंशी खरं आहे, पूर्ण सत्य नाही. त्याचं कारण असं की, ॲरिस्टॉटल क्राफ्टवर जास्त भर देतो, आर्टकडे लक्ष देत नाही. जे दिसतं, अनुभवाला येतं त्यावर त्याची भिस्त आहे. न दिसणाऱ्या पण असर करणाऱ्या गोष्टींना तो महत्त्व देत नाही. म्हणजे बघा; एखाद्या गोष्टीची मांडणी कशी आहे किंवा कशी केली आहे यावर तिचं सौंदर्य अवलंबून असतं असं ॲरिस्टॉटलचं म्हणणं आहे. फुलाचं उदाहरण घेऊन बघू. आकर्षक रचना असणारी आणि बघताक्षणी मनाला भुरळ घालणारी काही फुलं असतात. जशी की डेलियाची फुलं. शोभिवंत, आकर्षक, देखण्या सजावटीसाठी उपयुक्त. पण त्यांना सुगंध नसतो. डेलियाची सुंदर रचना हे निसर्गानं तयार केलेलं त्याचं क्राफ्ट आहे, पण त्याला सुगंध नाही. म्हणजे प्रतीकात्मक बोलायचं तर क्राफ्ट आहे पण आर्ट नाही. काही अशी आकर्षक

रचना नसलेली फुलं असतात. जशी की मोगऱ्याची फुलं. ती दिसायला मोहक नसतात, पण ती सुगंधी असतात. म्हणजे क्राफ्ट नाही पण आर्ट आहे. तर काही फुलं आकर्षक रचना असलेली आणि सुगंध असलेलीही असतात. जशी की गुलाबाची फुलं. गुलाब अत्यंत आकर्षक आणि विलक्षण सुगंधी. म्हणजे त्याच्यात दोन्हीही आहे क्राफ्ट आणि आर्ट. याचा अर्थ हा की, सौंदर्यबोध फक्त क्राफ्टवर, रचनेवर, दिसण्यावर आणि प्रावीण्यावर नसतो. तो असतो रचना आणि आशय, क्राफ्ट आणि आर्ट, तैयारी आणि असर यांचा सुयोग्य संगम.

हाच मुद्दा थोडा पुढे न्यायचा तर शिकवणं हा स्वतःच स्वतःचा घेतलेला शोध असतो. शिक्षक नेमलेला अभ्यासक्रम शिकवतो हे तांत्रिकदृष्ट्या बरोबर आहे. पण हे करताना शिक्षक बदलत राहतो. त्याचा अनुभव वाढतो, जाणिवा विस्तारतात, दृष्टिकोन बदलतात. विषय तोच असला तरी काळाबरोबर त्याचं आकलन वेगळं होत राहतं. तो/ती अधिक प्रगल्भ होत जातात. शिक्षकाचा सुरवातीचा अवखळपणा, चंचलता, छाप टाकायची वृत्ती बदलते. तो अधिक स्थिर, शांत होतो. आता विषयाच्या संथ वाहणाऱ्या प्रवाहात त्याला स्वतःची प्रतिमा स्पष्ट दिसते. इतिहास शिकवणाऱ्या शिक्षकाला थोर विभूतींच्या महानतेचे वेगळे पैलू दिसतात, तत्त्वज्ञानाच्या शिक्षकाला कांट, हेगेल, मार्क्स, सार्त्र वेगळ्या रूपात भेटतात. साहित्याच्या शिक्षकाला कालीदास, शेक्सपियर, कीट्स, प्रेमचंद, मर्ढेकर, तेंडुलकर, सुर्वे जगणं किती अनोखं आहे हे दाखवतात. शिक्षकाची त्याच्या विषयातली गुंतवणूक वाढत जाते तशी गोडी वाढत जाते आणि तसा त्याचा आवाका वाढत जातो. मग शिक्षकाला विषयापुरतं मर्यादित करणाऱ्या भिंती नष्ट होतात, जीवन समग्रतेने कळण्याच्या दिशा मोकळ्या होतात. विषयातील प्रावीण्य, अनुभव, अंतर्दृष्टी आणि विस्तारलेले भान या ऐवजावर शिक्षक मग तैयारी आणि असर यांची केमेस्ट्री तयार करू शकतो.

शिकवण्याची कोणतीच पुस्तकी पद्धत शिक्षकाला पारंगत आणि असरदार बनवू शकत नाही. शिक्षक होणं ही दीर्घकालीन प्रक्रिया आहे आणि ती फलदायी व्हायची असेल तर शिक्षकाने प्राप्त केलेलं ज्ञान प्रवाही केलं पाहिजे. हे प्रवाहीपण आर्ट म्हणजे भावना, संवेदनशीलता आणि सौंदर्यदृष्टी यांतून येत राहील.

तुम्हाला वाटेल की शिकवण्याविषयी माझं स्वप्नरंजन चाललंय किंवा मी जरा जास्त आदर्शवादी झालोय. पण असं नाही. क्राफ्ट आणि आर्ट यांची योग्य सांगड घातलेल्या कोणत्याही शिक्षकाच्या वर्गात तुम्ही जाऊन बसा. तुम्हाला प्रत्यक्ष अनुभव येईल की, विषयाची तैयारी असलेला शिक्षक संपूर्ण वर्गावर जबरदस्त असर करतोय.

**– डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे– ४१०५०४

•••

दिशा
नियमित
वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

डोळस श्रद्धा ही उत्कट प्रेमाचा भाग आहे.

# ॲना बर्न्सची ‘मिल्कमॅन’ : अस्वस्थ त्रिशतकाची डायरी

*२०१८ चा मॅन बुकर पुरस्कार ॲना बर्न्स यांना प्राप्त झाला. हा पुरस्कार प्राप्त करणाऱ्या नॉर्दर्न आयर्लंडच्या त्या पहिल्या लेखिका ठरल्या. श्रीमती बर्न्स यांच्या मिल्कमॅन या ताज्या, अस्सल कादंबरीने अत्यंत मानाचा बुकर पुरस्कार प्राप्त करून केवळ नवा इतिहासच रचला नाही तर त्यांच्या अस्सल सर्जनशीलतेने वाचकांना चकित करणाऱ्या आशय आणि निवेदनशैलीने नवी दालने उघडली आहेत. या कादंबरीबद्दल प्रा. डॉ. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी यांचा लेख- संपादक*




२०१८ साली पन्नासावा मॅन बुकर पुरस्कार प्राप्त झालेली ॲना बर्न्स या उत्तर आयर्लंड मधील लेखिकेची मिल्कमॅन ही कादंबरी. फेबर अँड फेबर प्रकाशनाने प्रकाशित केलेली व बुकर मिळालेली सलग चौथी कादंबरी. बुकर पुरस्कार मिळालेल्या उत्तर आयर्लंडमधील पहिल्या लेखिका. ॲना बर्न्स यांचा जन्म १९६२ साली उत्तर आयर्लंड मधील बेलफास्ट या शहरातला. सध्या त्या ईस्ट ससेक्स येथे इंग्लंडमध्ये राहतात.

१६ ऑक्टोबर २०१८ रोजी कादंबरीला पन्नास हजार पौंडांच्या बुकर पुरस्काराची घोषणा झाली. पुरस्कार समिती सदस्य क्वामे अँथोनी आपिअ यांच्या मते, प्रस्थापित चौकटींच्या पलीकडे जाऊन स्वतःचा असा एक स्वतंत्र आवाज उठवणारी; अनन्वित छळ, लैंगिक अतिक्रम व विद्रोहाचे व्यामिश्र संयोजन म्हणजे ही कादंबरी.

५८ वर्षांच्या असलेल्या ॲना बर्न्स यांची ही तिसरी कादंबरी. पहिली कादंबरी नो बोन्स २००१ साली प्रकाशित झाली. त्यात नॉर्थ आयर्लंडमधील राष्ट्रीय व वांशिक हिंसाचाराच्या काळाच्या पार्श्वभूमीवर बेलफेस्ट प्रदेशात घडणारी, एका मुलीच्या वयात येण्याची मनाची पकड घेणारी कथा होती. त्यातील भाषेच्या वापराबद्दल त्यांचे खूप कौतुक झाले आणि त्या कादंबरीची तुलना महान कादंबरीकार जेम्स जॉईस यांच्या एका कादंबरीशी करण्यात आली. त्यानंतर सहा वर्षांनी त्यांची दुसरी कादंबरी लिटल कन्स्ट्रक्शन्स प्रकाशित झाली. त्यात बंदुका, बलात्कार, कौटुंबिक व्यभिचार, हत्या आदींचे अतिवास्तववादी रेखाटन होते. त्यानंतर चार वर्षांपूर्वी प्रकाशित मोस्टली हिरो ही कादंबरीका सोडल्यास मिल्कमन ही त्यांची तिसरी कादंबरी.

१९६० ते १९९० दरम्यान आयर्लंड मुक्तीसंग्रामाच्या (या काळाला ट्रबल्स असेही म्हटले जाते) युद्धाच्या काळात ही कादंबरी घडते. उत्तर आयर्लंडच्या मुक्ती संग्रामाच्या धुमश्चक्रीच्या काळात स्त्रियांच्या मनोविश्वाचे दर्शन ही कादंबरी घडवते.

बेलफास्टमधे सत्तरच्या दशकात हे कथानक घडतं. हा काळ ट्रबल्स म्हणून ओळखल्या जातो. इंग्लंड मधील प्रोटेस्टंट व आयर्लंडमधील कॅथलिक यांच्या मधील संघर्षाचा हा काळ. आयर्लंड हा इंग्लंड पेक्षा

सांस्कृतिक दृष्ट्या वेगळा असून त्याची स्वायत्तता मागण्यासाठी बाराव्या शतकापासून संघर्ष सुरू असून तो १९९० पर्यंत सुरू होता. या पार्श्वभूमीवर कादंबरी आकाराला येते.

भारताचा स्वातंत्र्यलढा व आयर्लंड मुक्ती चळवळ यामध्ये विलक्षण साम्य आहे. किंबहुना भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये भाग घेतलेल्या व इंग्लंडमध्ये जाऊन राहिलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांसारख्या क्रांतिकारकांना आयर्लंड मुक्तिलढ्या बद्दल विशेष माहिती होती. अनेक आयरिश क्रांतिकारकांचा भारताच्या स्वातंत्र्यासाठी पाठिंबा होता. इंग्रजी साहित्याचे पदवी व पदव्युत्तर काळात अध्ययन करताना आपण हा धागा आवर्जून सांगितला तर इंग्रजी भाषेतील आयरिश साहित्याची व भारतीय स्वातंत्र्य लढ्याची गुंफण घट्ट होऊन ते अधिक रोचक करता येईल.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लिहिलेली एक विलक्षण इंग्रजी कविता म्हणजे ''अ रेवोल्युशनिस्ट इस टू हिमसेल्फ''

Let polar star of Dharma sole be thy guide
success, defeat, nor fame, nor praise, nor pride,
what if return they curse for my love
The surgeon's hand diseased hate all above
Hate they me for regenerations toil
Greater the reason then why I may soil
should serve the more ! work for them I will
In spite of all their faults I love them still.

प्रख्यात इंग्रजी कवी डब्ल्यूबीयेट्स यांनी लिहिलेल्या ईस्टर रायझिंग या कवितेतील खालील ओळी महत्त्वाच्या –

To know they dreamed and are dead;
And what if excess of love
Bewildered them till they died?
I write it out in a verse -
MacDonagh and MacBride
And Connolly and Pearse
Now and in time to be,
Wherever green is worn,
Are changed, changed utterly:
A terrible beauty is born.

- W.B. Yeats, Easter 1916

येट्सच्या वरील कवितेचा संदर्भ मिल्कमॅन कादंबरीला आहे. या कादंबरीतील शहराला नाव नाही, त्यातील पात्रांनाही नावे नाहीत. या अनामिक शहरात, लक्षवेधक, आकर्षक असणे धोकादायक आहे अशी समजूत असलेली आणि सगळे लपवू पाहणारी मधली बहीण ही या कथेची नायिका आहे. घाटात्मक पातळीवर ती सोपी वाटत असली तरी त्यातील अपरिहार्यता, छोट्या समुदायांचे दबाव, कुचाळक्या आणि लैंगिक शोषण आदींचा मर्मभेदक विनोदाद्वारे झालेला तो उत्कट आविष्कार आहे. या कादंबरीद्वारे न सांगितल्या गेलेल्या लैंगिक शोषणाच्या कहाण्या सांगितल्या गेल्या आहेत.

मिल्कमॅन डिस्टोपीअन कादंबरी आहे, पण ती नुसतीच गंभीर नाही. काहीशा विक्षिप्त विनोदाला त्यात स्थान आहे. इथला मिल्कमॅन कोण आहे, काय करतो हे संदिग्धच आहे. तो शक्तिशाली सेनाधिकारी आहे. निवेदिका ती गोष्ट लपवण्याचा प्रयत्न करते. कारण न जाणो, तिच्याकडे लक्ष वेधलं जाईल आणि स्वत:कडे लक्ष वेधलं जाण्यासारखा दुसरा धोका नाही.

या कादंबरीची नायिका एक सोळा वर्षीय तरुणी आहे. तिला कुठले नाव दिले नसून 'मधली बहीण' अर्थात 'मिडल सिस्टर' या नावाने तिला ओळखतात. मधली बहीण म्हणजे आपल्या पालकांच्या अकरा

---

मुलांमधील एक अपत्य. उरलेली इतर भावंडे एकतर परागंदा झालेली किंवा निधन पावली आहेत. आपल्या विधवा आई सोबत व तीन बहिणीं सोबत ती राहते. घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे काम करता करता शिकण्यासाठी रात्रीच्या शाळेत जाण्याशिवाय पर्याय नाही. एक दिवस ४१ वर्षांचा निमलष्करी जवान, ज्याला कादंबरीत मिल्कमॅन असं म्हटलं आहे, तो पांढरी गाडी घेऊन रस्त्यात तिला भेटतो व आपल्या गाडीतून घरी सोडतो. तिथे त्याची व तिची ओळख होते. मधल्या बहिणीला आधीपासूनच एक प्रियकर आहे. मात्र मिल्कमॅन तिच्याशी सलगी करण्याचा प्रयत्न करतो. तो तिच्या प्रियकराला मारण्याची धमकी देतो. तिच्या व मिल्कमॅनच्या संबंधामुळे तिला कायम भीतीच्या सावटाखाली जगावे लागते. या संबंधांमुळेच तिचा समाज तिला वाळीत टाकणार असं तिला समजतं. एक दिवस ती आपल्या प्रियकराला भेटायला जाते व तिला समजतं की त्याचे त्याच्या मित्रा बरोबर संबंध आहेत. तिला वाईट वाटतं. ती परत फिरते. वाटेत मिल्कमॅन परत भेटतो व दुसऱ्या दिवशी तिला डेटवर नेणार असे सांगतो. दुसऱ्या दिवशी तिला असं समजतं की, सरकारी कर्मचाऱ्यांनी मिल्कमॅनला मारलं आहे. सुटकेचा निश्वास टाकून ती क्लबात जायला निघते तेव्हा तिच्यावर हल्ला होतो. तिच्यावर एकतर्फी प्रेम करणाऱ्या कुणीतरी हा हल्ला केलेला असतो. त्यातून ती स्वतःचा बचाव करते. कादंबरीच्या शेवटी ती सामान्य जीवन जगत आहे असे दाखवले आहे.

१९७० च्या कालखंडात अनामिक देशात कादंबरी घडते. लेखिका बेलफास्टच्या रहिवासी असल्याने साहजिकच त्याचे संदर्भ कथेत येतात. आयरिश रिव्हॉल्युशन आर्मीसहित अन्य संघटना व त्यांचे हेतू, त्यातला लोकसहभाग, सरकारविरुद्धचा एल्गार हे सगळं मांडत असताना दरम्यानच्या काळात केवळ किवदंती व अफवांचा आधार घेत लैंगिक अत्याचार कसे पार पाडले जातात यावर लेखिका भाष्य करते. प्रत्यक्ष अत्याचार होत असताना दोनच मानवी भूमिका राहतात, शोषक आणि पीडित, हे त्या अधोरेखित करतात. 'सरकारविरुद्ध मांडलेली कोणतीही भूमिका गैरच' हा जो काही दृष्टीकोन सरकारचे समर्थक मांडतात त्याला लेखिका प्रखर शब्दात झोडपून काढतात.

कादंबरीत जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष चितारला गेला आहे. राजरोस पडणारे मुडदे, दडपशाही, सरकारी दमण शोषण आणि त्या आडून चालणारा सत्ताभोग व त्याला होणारा विरोध हा कादंबरीतून प्रभावीपणे डोकावतो.

गार्डियन वृत्तपत्रासाठी कादंबरीचे परीक्षण लिहिताना प्रख्यात कादंबरीकार क्लेयर कीलरॉय यांच्या मते 'कादंबरीतील निवेदिका व कादंबरी दोन्हीही स्वतंत्र धाटणीची, मिश्कील विनोदांची पेरणी असलेली, निःसंकोचपणे तिरकस आणि विलक्षण आहे'.

ही कादंबरी केवळ उत्तर आयर्लंड मधील धुमश्चक्रीचे वर्णन करत नसून एकूणच राजकीय उलथापालथीच्या काळातील ताणतणावात जगणाऱ्या समाजाचा वैश्विक अनुभव चित्रित करते. भीतीच्या सावटाखाली कायम राहणाऱ्या समाजातील मानसिक परिणामांवर भाष्य करणारी ही कादंबरी. दोन राष्ट्र किंवा संप्रदायामधील विकोपाला गेलेल्या संघर्षातून स्त्रियांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराचे प्रखर चित्रण ही कादंबरी करते. स्ट्रिम ऑफ कॉन्शसनेस या कादंबरीतील निवेदन शैलीचा वापर लेखिकेने केला आहे.

कादंबरीतील एक महत्त्वाचे वाक्य म्हणजे –

'To be interesting is to be noticed and to be noticed is dangerous'.

---

बुद्धीच्या जोरावर चित्त एकाग्र करणं सोपं जातं.

बुकर पारितोषिक कमिटीच्या परीक्षकांनी खालील निरीक्षण नोंदवले आहे.-

"The language of anna Burns' Milkman is simply marvellous; beginning with the distinctive and consistently realised voice of the funny, resilient, astute, plain-spoken, first-person protagonist. From the opening page her words pull us into the daily violence of her world - threats of murder, people killed by state hit squads - while responding to the everyday realities of her life as a young woman, negotiating a way between the demands of family, friends and lovers in an unsettled time. The novel delineates brilliantly the power of gossip and social pressure in a tight-knit community, and shows how both rumour and political loyalties can be put in the service of a relentless campaign of individual sexual harassment.Burns draws on the experience of Northern Ireland during the Troubles to portray a world that allows individuals to abuse the power granted by a community to those who resist the state on their behalf. Yet this is never a novel about just one place or time. The local is in service to an exploration of the universal experience of societies in crisis.'

'अत्यंत विखारी विनोदाने भरलेली व समाजाचे बहुरंगी चित्रण करणारी' असे वर्णन द टेलिग्राफ या वृत्तपत्राने केले आहे. आयरीश टाइम्स वृत्तपत्राने या कादंबरीबद्दल 'एक विलक्षण शब्दबंबाळ आणि विनोदी अशी ही कादंबरी म्हणजे साहित्याच्या क्षीतिजावरील उगवता तारा ठरणाऱ्या ॲना बर्न्स यांच्या कर्तृत्वाचा दाखला देणारी' असे म्हटले आहे.

### संदर्भ


1. https://thebookerprizes.com/news/anna-burns-wins-50th-man-booker-prize-milkman ::text=-nna%20Burns%20wins% 2050th, and%20her%20first%20major%20award.
2. https://www.google.com/amp/s/www.nytimes.com/2018/10/16/books/anna-burns-wins-man-booker-prize-milkman.amp.html%3f0p19G=6214

३. महाराष्ट्र टाइम्स गणेश मतकरी यांचा १९ऑगस्ट २०१८ लेख https://www.google.com/amp/s/maharashtratimes.com/editorial/samwad/booker-books-2018/ampšarticleshow/65446431.cms

४. https://sameerbapu.blogspot.com/2018/12/blog-postš8.html?m=1

५. https://www.supersummary.com/milkman/summary/



– डॉ. प्रशांत धर्माधिकारी
इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी – ९४२२४९५०९४


•••

## दिशासाठी


**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# प्रकाशवाटा

*स्वर्गीय डॉ. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेच्या रौप्य महोत्सवी व्याख्यानाचे पुष्प प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री डॉ. प्रकाश व मंदाकिनी आमटे यांच्या मुलाखतीने गुंफले गेले. ही मुलाखत विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. प्रशांत धर्माधिकारी व डॉ. मृण्मयी थत्ते यांनी यांनी घेतली. या मुलाखतीचे शब्दांकन बी. एम. एम. तृतीय वर्ष पत्रकारितेची विद्यार्थिनी गौरी अनिरुद्ध गोरेगावकर हिने केले आहे - संपादक*



मॅगेसेसे पुरस्कार विजेते पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे आणि डॉ. मंदाकिनी आमटे यांनी गेली चार दशकं महाराष्ट्रातील दुर्गम भागातील आदिवासींना जगण्याच्या 'प्रकाशवाटा' दाखवल्या. बाबा आमटे यांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या ह्या समाजकार्याच्या वृक्षाला वटवृक्ष करणारी ही दोन व्यक्तिमत्त्व. दि. ७ सप्टेंबर २०२० रोजी जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या स्मृतिव्याख्यानमालेचे रौप्य महोत्सवी (अर्थात २५ वे) पुष्प गुंफले गेले. त्या निमित्ताने तरुण पिढीला समाजकार्याची प्रकाशवाटा दाखवण्यासाठी डॉ. प्रकाश आमटे आणि डॉ. मंदाकिनी आमटे उपस्थित राहिले होते. फेसबुक या ऑनलाईन माध्यमाद्वारे हा कार्यक्रम पार पडला. ही मैफल मुलाखत स्वरूपात पार पडली. ती मुलाखत प्राध्यापक डॉ. प्रशांत धर्माधिकारी आणि प्राध्यापिका डॉ. मृण्मयी थत्ते यांनी घेतली.

शृंखला पायी असू दे, मी गतीचे गीत गाई
दुःख उधळायास आता, आसवांना वेळ नाही!
– 'ज्वाला आणि फुले' कवितासंग्रह

- श्री. प्रकाश बाबा आमटे तुमच्या प्रवासाची सुरुवात ही अर्थात ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांच्या वारशाने झाली. मग त्यांच्या आठवणींबद्दल सुरुवातीला काय सांगाल आणि त्यांचे सुपुत्र म्हणून त्यांच्या एकंदरीत कार्याच्या उंचीकडे पाहून तुम्हाला कधी दडपण आलं का?

–बाबा सर्वसामान्य लोकांप्रमाणे त्यांच्या काळामध्ये जगू शकले असते. त्यांचे वडील तसेही जमिनदार होते. त्यांच्या घरी कुठल्याही गोष्टीची कमी नव्हती. परंतु माणसाच्या आयुष्यामध्ये असे काहीतरी टर्निंग पॉइंट येतात ते त्यांचं आयुष्य बदलवून टाकतात. बाबांनी पहिले वकिलीची परीक्षा दिली, कारण वडिलांची इच्छा होती. परंतु १९४२ च्या चळवळीवेळी गांधीजी सेवाग्रामला आले होते आणि मग त्या वातावरणात राहून बाबांना समजलं की, वकिली व्यवसायात आपण गरिबांना न्याय देऊ शकत नाही. मग त्यांनी राजकारणात पदार्पण केलं आणि वडोदरा म्युनिसिपालिटीचे उपाध्यक्ष झाले. परंतु राजकारणात स्पष्टवक्तेपणा चालत नाही हे त्यांना समजलं. मग एके दिवशी तो प्रसंग आला, ज्यावेळेस गाडीतून जाताना रस्त्याच्या कडेला त्यांना तो कुष्ठरोगी सापडला. हाच तो टर्निंग पॉइंट! तो कुष्ठरोगी विकलांग होता. अंगावरीच्या त्याच्या अनेक जखमा होत्या, त्यात जखमांत अळ्या पडल्या होत्या. त्याला बघून बाबांना भीती वाटली. त्या वेळेस फक्त त्यांनी आपल्या अंगावरचं कांबळं त्या कुष्ठरोग्याच्या अंगावर

टाकून निघाले. कालांतराने त्यांनी विचार केला की, मला भीती का वाटली; ऐतिहासिक भग्नावेशातलं सौंदर्य पाहायला संपूर्ण जगातली माणसे येत असतात; मग माणसाच्या भग्नावेशातले सौंदर्य आपल्याला का पहावलं नाही?

मग उद्या जर आपल्याला किंवा आपल्या परिवाराला कुष्ठरोग झाला तर का आपण स्वतःला किंवा आपल्या कुटुंबातल्या माणसाला रस्त्यावरती भेटायचं का? मग त्या वेळेस त्यांच्या भीतीवर विजय मिळवण्यासाठी त्यांनी आनंदवनाची स्थापना केली. महारोगी सेवा समिती उभारण्यासाठी सर्वांनी त्यांना विरोध केला; अगदी परिवाराने सुद्धा. तरीही त्यांनी वडोदरापासून चार किलोमीटर अंतरावर आनंदवन उभारलं. परंतु कुष्ठरोगाबद्दल जनजागृतीसाठी त्यांनी 'महारोग सेवा समिती' हे नाव ठेवलं, ठेवावं लागलं.

आम्ही लहान असताना बाबांचं एवढं नाव झालं नव्हतं म्हणून तेव्हा दडपण आलं नाही. आम्हाला बाबांनी सर्वसामान्य मुलांसारखंच म्युनिसिपालिटी शाळेत शिकवलं. अकरावीमध्ये मॅट्रिक झाल्यावर मी आणि विकास (माझे बंधू) आम्ही बाबांचं काम पुढे न्यावं किंवा जर मेडिकल कॉलेजात प्रवेश मिळाला तर ग्रॅज्युएशन नंतर बाबांना मदत करावी असं ठरवलं आणि सुदैवाने नागपूर मेडिकल कॉलेजमध्ये १९६६ ला आम्हाला प्रवेश मिळाला. १९७० ला एम.बी.बी.एस. झालो.

बालपण असं काही सांगण्यासारखं होतं कारण आनंदवनात आयसोलेशन होतं. परंतु बाबांकडे येणारे प्रसिद्ध लोक अर्थात पु. ल. देशपांडे, कुमार गंधर्व, कुसुमाग्रज यांच्याकडे पाहून मात्र आम्हाला हेवा वाटायचा. कामाचं महत्त्व कळलं तेव्हा थोडे दडपण आलं. बाबांचं साधे राहणीमान होतं; परंतु ते फार कडक शिस्तीचे होते. शिस्तीच्या बाबतीत, स्त्री सन्मानाच्या बाबतीत झालेली हयगय त्यांना सहन होत नसे. हा नियम जसा आनंदवनासाठी होता. तसाच तो आम्हालाही लागू व्हायचा. बाबा स्वतः शिस्तीने ही सामाजिक कामे करायचे. सामाजिक संस्था चालवताना आपल्याला ट्रान्सपरन्सी पाहिजे हे त्यांचं नेहमी वाक्य असायचं. 'हिशोब आरशासारखा स्वच्छ पाहिजे' ही शिस्त पहिल्या दिवसापासून बाबाने लावली होती. म्हणूनच १४ रुपयांनी सुरू केलेलं आनंदवन हे साठ-सत्तर कोटींचा बजेट आज झालेला आहे. १९७० साली एम.बी.बी.एस.चे शिक्षण घेऊन आम्ही घरी आलो तेव्हा बाबा म्हणाले की, आपण आज पिकनिकला जाऊ (कदाचित या मागे त्यांच्या काही वेगळा विचार असावा) सर्वांनी तयारी केली आणि व्हॅनमध्ये बसलो. भामरागड हे नाव तेव्हा प्रसिद्ध नव्हतं तरीही निसर्गाच्या सानिध्यात आणि जंगल सफारी आणि जंगल सफारी करायची म्हणून आम्हाला आनंद झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर ठरवले इतक्या दूर आलो आहोत तर जवळपास जरा पाहू कोण राहते इथे असं मी ठरवलं. आमच्या जीपचा आवाज ऐकून तेथील रहिवासी घाबरून बाहेर आले. ते पाहून आम्हाला आश्चर्य वाटलं असं का ही लोकं करत आहेत? मग दुसऱ्या गावात गेलो तिथे आमच्याशी कोणी बोललेच नाही. त्यानंतर आम्ही भामरागडला परत आलो आणि माझ्या डोक्यात सकाळपासून घडलेल्या काही गोष्टी फिरत होत्या म्हणून मी बाबांना विचारलं. ते म्हणाले की,- आनंदवनाचा आवाका तसा वाढत आहे. तुम्ही पण ते पाहत आहात तर मला जोडव्यवसाय म्हणून या माडिया आदिवासी लोकांसाठी काहीतरी करायचं आहे. बाबा हे म्हणताच मला समजलं की बाबांचा भामरागड येथे येण्यामागे नेमकं काय विचार होता आणि दुसऱ्या क्षणाला मी त्यांना बोललो की, तुम्ही जर आदिवासींसाठी हे काम चालू करणार असाल तर ते पुढे मी नेईन. ते ऐकून त्यांना इतका आनंद झाला की, तो डोळ्यांतून व्यक्त झाला. त्यानंतर इंटर्नशिप करायची होती. पण बाबा बोलले की, त्याआधी माडिया आदिवासींसाठी काहीतरी करायचे असेल तर जागा हवी. म्हणून त्यासाठी ब्युरोक्रसीकडे कागदपत्र देणे गरजेचे आहे. पण कालांतराने आम्हाला

कळले की, ब्युरोक्रसी निर्णय द्यायला वेळ लावतात. तोपर्यंतच्या कालावधीत पोस्ट ग्रॅज्युएशन करण्याचा मी निर्णय घेतला. या काळात मंदाकिनीशी भेट झाली. म्हणजे वाईटातून चांगलं होतं ना ते हेच यावर माझा विश्वास बसला. ती तिथे Anesthesian म्हणून काम करायची. ती सिनियर होती मला. मग आमचे हळूहळू मैत्रीचे प्रेमात रूपांतर झाले आणि लग्नाचा निर्णय घेतला. ते आमच्या बंधूंना समजल्यावर त्यांनी बाबांना सांगितलं व मंदाकिनी पण माझ्याबरोबर काम पाहण्यास तयार होती. बाबांनीही विरोध केला नाही, कारण तिने शब्द दिलाच नाही तर तो पाळलाही. अशा पद्धतीने आमचं लग्न पार पडलं. अगदी साध्या पद्धतीने. कारण आज आपल्याकडे कोट्यवधी रुपये लोक लग्नावर उधळतात तर दुसरीकडे आदिवासींचे लग्न साध्या चिमणीच्या प्रकाशात होतं म्हणून आनंदवनात वैदिक पद्धतीने पत्रिका न बघता, मुहूर्त न बघता १४ डिसेंबर १९७२ साली सानेगुरुजींच्या जयंतीच्या दिवशी आमचं लग्न पार पडलं. कारण साने गुरुजी हे बाबांचे प्रेरणास्थान होते. अशाप्रकारे हेमलकसाची सुरुवात १९७४ च्या मार्चपासून झाली आणि गेली ४७ वर्षे हेमलकासाची ही ज्योत अविरत प्रज्वलित आहे.

• इंद्रावती नदीकाठी झोपडी मधून तुमच्या संसाराला सुरुवात झाली. आज एवढं अध्यावत सोयीसुविधा असलेलं स्वयंपाक घर असतानाही आमची चिडचिड होते; तुम्ही तर झोपडीमध्ये राहून होते. तुम्ही तर झोपडीमध्ये राहून तुमचा प्रापंचिक डोलारा सांभाळत होतात. मग लोकसेवा, घर, मुलांचं संगोपन ही सगळी तारेवरची कसरत तुम्ही कशी सांभाळली?

प्रथम तिथे गेल्यानंतर तिथले आयुष्य किती वेगळं आणि खडतर असणार आहे ही कल्पना प्रत्यक्षात पोहोचल्यावर आली. जंगलात काय आहे, काय नाही हे काहीच ठाऊक नव्हतं. पहिल्यांदा मी जेव्हा तिथे गेलो त्यावेळेस फक्त झाडी आणि छोटे-छोटे पाडे होते. अशा ठिकाणी आपण राहणार, त्या ठिकाणी बोलायला कोणी नाही, रस्ते नाही, वीज नाही आणि सहा महिने या भागात आपण राहणार हे किती डिफिकल्ट होणार आहे तिथे गेल्यावरच आम्हाला समजलं! गेल्यावरती राहायला काहीच नव्हतं, जागा मिळाली होती परंतु ते संपूर्ण जंगल होतं. त्या ठिकाणी मग आम्ही आमच्या झोपड्या उभ्या केल्या आणि झोपडीमध्ये संसार सुरू केला. बाबांच्या प्रेरणेने आमच्याबरोबर काही तरुण सुशिक्षित मुलं चांगल्या नोकऱ्या सोडून आमच्याकडे समाजकार्यासाठी आली होती. त्या लोकांशी आमचा फारसा परिचय नव्हता, पण एकत्र आम्ही तिथे काम करायला सुरुवात केली आणि त्या ठिकाणी दुकानं, बाजार काहीच नव्हतं म्हणून आम्ही एक कॉमन कुटुंब तयार केलं. सगळ्यांनी एकत्र जेवायचं, एकत्र कामं करायची. प्रत्येकाला झोपड्या वेगवेगळ्या होत्या. मात्र जेवण हे एकत्र व्हायचं. हा म्हणजे एक वेगळाच प्रवास होता; कारण आपल्याला सवय असते आई-वडील, भाऊ-बहीण असे एकत्र राहायचं; परंतु त्या ठिकाणी सगळे अनोळखी आम्ही एकत्र राहिलो आणि आमचं त्यातून कुटुंब तयार झालं आणि त्यावेळेला कसं व्हायचं मी एकटी स्त्री होते. त्यातील अजून दोघांचं लग्न झालं होतं, परंतु बाकीचेही लोकं एकटेच होते; कोणाचे लग्न झालं नव्हतं. त्यामुळे मला बोलायलासुद्धा कोणी सुशिक्षित स्त्री मैत्रीण म्हणून नव्हती. काम करायला मात्र आनंदवनातून काही दोघी-तिघी पेशंट आल्या होत्या मदतीसाठी. मात्र स्वयंपाक करायला कोणी नव्हतं. मग आम्ही एका मुलाला तयार केलं. तो आनंदवनामध्ये असाच काम करायचा. त्याला जेवण शिकवलं. वरण, भात, भाजी, पोळी, भाजी कसं करायचं ते शिकवले आणि मग आम्हा सगळ्यांसाठी कॉमन स्वयंपाक तो करायचा आणि त्या भागात काहीच मिळत नव्हतं. त्यामुळे काय करायचं हा मोठा प्रश्न असायचा. वरण-भात मात्र नक्की असायचा. बाकी कणिक वगैरे टिकायची नाही. कारण चक्की नव्हत्या. त्यामुळे हाताने दळून पीठ निघायचं तरच पोळी खायला मिळणार अशी अवस्था होती. अशा परिस्थितीमध्ये आपल्या आवडीनिवडी

बाजूला ठेवाव्या लागतात; जे आहे त्याच्यामध्ये समाधान मानावे लागत होते. आम्ही सर्वांनी ठरवलं होतं की, कोणत्याही प्रकारे तक्रार करायची नाही. कारण तक्रार केली म्हणजे कालांतराने चिडचिड निर्माण होते आणि आपण तक्रार करायला लागल्यावर आपल्याबरोबर आलेले कार्यकर्ते निराश होणार आणि मग कामामध्ये लक्ष लागणार नाही आणि आम्ही ठरवलं होतं की, आपण स्वतः असं काही त्या मुलाला वेगळे काही बनवायला सांगायचं नाही. तो जे बनवेल ते नम्रपणे खायचं. कारण आपण ज्या आदिवासींसाठी काम करायला आलो आहोत त्यांना दोन वेळचं खायलाही मिळत नाही. ते भाताची आमटी कधीतरी शिकार मिळाली तर शिकर, उंदीर, मुंग्यांची चटणी असे त्यांचं खाद्य असायचं. काही दिवसांनी करमणुकीचे साधन म्हणून आम्ही जंगलात फिरायला सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात तर कोणते पेशंटही आमच्याकडे येत नव्हते. कारण त्यांचा या सगळ्या गोष्टींवर विश्वास नव्हता. वेळ कसा घालवायचा? या लोकांना कन्व्हीस कसं करायचं की दवाखान्यात या म्हणून? असे अनेक प्रश्न होते. या कालावधीत थोडीफार जमीन होती तर त्या वरचं जंगल साफ करून आम्ही तिथे शेती करायला लागलो. लोक फक्त लांबून बघायचे परंतु त्यांच्याशी संपर्क करता येत नव्हता. कारण भाषा वेगळी होती. हळूहळू आम्ही त्यांच्याकडून भाषा शिकायला सुरुवात केली. काही लोकांना मराठी येत होतं. लोकनेते पनिशमेंट पोस्टिंगसाठी आले होते अशी लोकं इलाज नसल्यामुळे तिथे राहत होते. त्यामुळे मराठी त्या लोकांना येत होती आणि त्यांच्या सहवासात राहिल्यामुळे त्या आदिवासी लोकांना मराठी भाषा थोडीफार येत होती. मग आम्ही त्यांच्याकडून ती भाषा शिकण्याचा प्रयत्न केला आणि मग त्यामुळे आदिवासींशी आम्ही बोलायला सुरुवात केली. मोडक्या-तोडक्या भाषेमध्ये त्यांच्याशी आम्ही बोलत होतो. त्यामुळे त्यांना थोडी जवळीक वाटायला लागली आणि ते देखील हळूहळू आमच्याशी बोलायला लागले आणि मग आम्ही गावागावात फिरून त्यांच्या काय समस्या आहेत ते समजून घेण्याचा प्रयत्न केला आणि ते प्रयत्न करत असताना त्यांनाही असं वाटायला लागलं की, हे लोक आपल्यासाठी आले आहेत. आपल्याला मदत करू इच्छितात. तेव्हा मी त्यांना विचारलं की, तुमच्याकडे कोणी आजारी असेल तर तुम्ही काय करता? तर त्यावेळेस त्यांनी सांगितलं की आमच्या प्रत्येक गावामध्ये पुजारी असतो मंत्रतंत्र करणारा; तो मग आम्हाला मदत करतो. काही दिवसांनी आम्हाला लक्षात आलं की मंत्र-तंत्राने बरेच लोक जास्त सिरीयस होतात आणि मग देवाची इच्छा समजून त्याला मृत घोशित केलं जातं. ते ऐकल्यावर आम्ही त्यांना बोललो की जर रुग्ण नाही बरा झाला तर तुम्ही त्याला आमच्याकडे घेऊन या. आमच्या सांगण्यावरून पहिले दोन पेशंट आले आणि ते बरे होऊन गेले ती मोठी जाहिरात झाली. एक पेशंट खांद्यावरून डोलीवर उचलून आणला होता आणि तो बेशुद्ध अवस्थेत होता. त्यामुळे त्याच्या नातेवाईकांनी त्याला आमच्या दवाखान्यात आणून ठेवलं. आमच्या झोपडीतच दवाखाना होता; काय करावं, काय नाही ते समजत नव्हतं. नंतर तो बेशुद्ध कशाने पडला आहे हे कळणे जरा कठीणच होतं आणि त्यावेळेस कन्सल्टेशनसाठीही कोणी नव्हतं. मग आम्ही दोघांनी एकमेकांशी चर्चा केली. त्यावेळेस असं निष्पन्न निघालं की, हा कदाचित डेंग्यू किंवा मलेरिया असावा. त्याप्रमाणे आम्ही त्याच्यावर ट्रीटमेंट करायला सुरुवात केली. रात्रंदिवस आम्ही त्यांच्या उशाशी बसून असायचो. त्याला सलाईन लावायचो. कार्यकर्ते तर कोणीतरी चोवीस तास त्याच्या उशाशी असायचं. तिसऱ्या दिवशी त्या रुग्णांनी आपले डोळे उघडले आणि पाचव्या दिवशी तो पूर्ण शुद्धीवर आल्यानंतर बोलायला लागला आणि मग तो आपली खाट खांद्यावर घेऊन आम्हाला न सांगता निघून गेला! त्यावेळी त्या लोकांमध्ये जनजागृती झाली आणि त्यांना समजलं की, आमच्या उपचारांमुळे माणसं बरी होतात आणि मग हळूहळू पेशंट यायला सुरुवात झाली. भरपूर लोक यायला लागले आणि दवाखाना सुरू झाला. मात्र त्यानंतर हेमलकसाला

गेल्यानंतर जन्माला आलेली ही दोघेजण आहेत. त्यांचे लहानपण असंच गेलं, कारण आम्ही दोघेही दवाखान्यात असायचो. काम करणारे होते ते काही वेळ सांभाळायचे. कालांतराने आम्ही असा निर्णय घेतला की, शाळा सुरू करू. आदिवासींच्या ठिकाणी आमच्या मुलांनी पण शिकावं. त्यामुळे आदिवासी मुलांबरोबरच आमची मुलंही शिकली.

• त्या दिवसात पुजारी आणि भगत यांचा मोठा पगडा होता. त्यातही तुमच्याकडे पहिला पेशंट आला आणि मग पेशंट येण्याची मालिका सुरू झाली. आयुष्यामध्ये सुशिक्षित माणसांकडूनसुद्धा डॉक्टरांनी दिलेले एखादं मेडिकल प्रिस्क्रिप्शन हरवतं. ती आदिवासी लोकं तर फार शिक्षित नव्हती. अशा अशिक्षित लोकांना तुम्ही कशा प्रकारे गोळ्या-औषधं कशी घ्यायला पाहिजेत याची कशी सवय लावली म्हणजे त्यांना कळत होतं का, की कोणत्या गोळ्या कुठल्या वेळेस, दिवसांमध्ये घ्यायच्या?

खरं म्हणजे शिक्षण नसल्यामुळे आणि या सगळ्या गोष्टी कधी अनुभवल्या नसल्यामुळे त्यांना फार कठीण जायचं. जर खरंच गरज असेल तर मग अशा वेळसे आम्ही त्या पेशंटला ॲडमिट करून घ्यायचो आणि आम्हीच आमच्याच निरीक्षणाखाली त्यांना सगळी औषधं दिली जायची. डिस्पेन्सरी आम्ही झाडाखालीच बनवली होती आणि बाकीच्या लोकांना जर दिवसातून एखाद्याला तीन डोस द्यायचे असतील तर आमचे कार्यकर्ते त्यांच्याकडे जायचे आणि त्यांना त्या गोळ्या वेळोवेळी द्यायचे आणि सांगायचे की, 'सूर्योदयाला एक गोळी, सूर्य डोक्यावर आल्यावर दुसरा डोस घ्या आणि रात्री झोपायच्या आधी तिसरा घ्या' असं व्यवस्थित सांगितलं जायचं. त्यावेळी त्यांच्याकडे घड्याळं नव्हती, पण अशा पद्धतीने आम्ही त्यांना सांगायचो. यात मजेची बाब अशी की, लवकर बरं व्हायचं म्हणून काही लोक तीन दिवसाच्या गोळ्या एकाच दिवशी घ्यायचे. अशा वेळेस त्यांना साइड इफेक्ट व्हायचा. असा अती डोस झाला की परत त्याला खाटेवर टाकून आमच्याकडे घेऊन यायचे. 'तुम्ही दिलेल्या गोळ्यांमुळे बघा काय झालं म्हणून.' मग गोळ्या कुठे असं विचारल्यावर ते सांगायचे की, लवकर बरं व्हावं म्हणून सगळ्या गोळ्या खाऊन टाकल्या. म्हणून त्यांच्यावर उपचार करावे लागायचे. मी नेहमी सर्वांना सांगतो की, 'गरज आम्हाला होती. त्यांनी औषध घ्यावे ही गरज आम्हाला होती.' त्यांच्या तर काय मंत्रतंत्र, बळी देणे ह्याच्यावर विश्वास होता. अशा पद्धतीने आम्ही सर्वांनी खूप प्रयत्न केले. आमचे कार्यकर्ते पण खूप चांगले आणि सहकार्य करणारे होते आणि निरपेक्ष भावाने येथे काम करायला आले आणि मग आपण शाळा सुरू केली १९७६ ला. ही सुद्धा शाळा सुरू का केली? हा काय आमचा प्लान नव्हता. आधी तसं पाहायला गेलं तर आम्ही दोघेही डॉक्टर असल्याकारणाने आम्ही इंडोर एखादा दवाखाना काढून काम करू शकलो असतो, पण त्यानंतर असं समजलं की, तेथील लोकांना त्यांच्या हक्कांबद्दल जाणीव नव्हती आणि त्यांच्या हक्कांचं शोषण केले जाते. अधिकारी लोक ह्यांना रोजगार हमीचे पैसे देत नाही; तेव्हा आम्ही त्यांच्या विरुद्ध तक्रारी केल्या त्यांच्या हक्कांचं रक्षण करण्यासाठी. पण कालांतराने आमच्या सर्व कार्यकर्त्यांना असं वाटलं की, आपण यांना शिक्षित करणे जास्त गरजेचे आहे. जेणेकरून त्यांना त्यांच्या स्वतःच्या हक्काची जाणीव होईल. मग १९७६ साली आम्ही सर्व गावागावांमध्ये जाऊन याविषयी जनजागृती केली; त्यातही लोकांचा विरोध होता. शिक्षण म्हणजे काय? आणि त्याची काय गरज आहे? कशासाठी आम्ही आमची मुलं तुमच्याकडे ठेवायची? त्यांच्यावर काय परिणाम होईल? तुम्ही त्यांना परत कराल की नाही? जंगलातून जाता-येता जर कुठल्या वन्यप्राण्यांनी किंवा श्वापदांनी हानी पोहोचविण्याचा प्रयत्न केला तर जबाबदार कोण? असे अनेक प्रश्न त्यांच्या मनात होते. याचे उत्तर देण्यासाठी मी त्यांना सांगितलं की, 'तुम्ही स्वतःच इतके हजाराहून जास्त पेशंट नेहमी उपचारासाठी माझ्याकडे येतात तेव्हा तुम्ही हा विचार करत नाहीत

ना, मग या बाबतीत का करत आहात? या शिक्षणासाठी आम्हाला एक संधी द्या. जर तुमच्या मुलांना आवडले नाही तर तुम्ही केव्हाही त्यांना घेऊन जाऊ शकतात, नाईलाज म्हणून त्यांनी पंचवीस मुलं पाठवली आणि वर्ष संपता संपता त्यातली दहा पळून गेली आणि राहिलेली १५ त्यांना खरोखरच खूप आवडलं शिक्षण. त्यांना आम्ही शेती शिकवली, हक्कांची जाणीव निर्माण करून देण्यासाठी विविध गोष्टी शिकवल्या. जेवणही आमचं एकत्र व्हायचं. या सगळ्याचा परिणाम त्या मुलांवर झाला आणि त्या मुलांनी काही काळानंतर गावागावात जाऊन आणखी मुलं आणायला सुरुवात केली. दोन वर्षानंतर पालकानीच आपणहून इतर मुलांना आणायला सुरुवात केली. त्यामुळे शाळेबद्दल अवेरनेस प्रचंड निर्माण झाला आणि आनंदाची गोष्ट अशी की, पहिली तीन मुलं बारावीपर्यंत गेली. मग आम्ही त्यांना आनंदवनात पाठवलं. एक फॉरेस्ट ऑफिसर झाला, दुसरा शिक्षक झाला, तिसरा मेडिकल कॉलेजपर्यंत गेला. तो मुलगा जिथे आमचे शिक्षण झालं त्या कॉलेजमध्ये शिकून शिक्षण पूर्ण केलं. त्या कॉलेजमध्ये शिकून आमच्यापेक्षा जास्त शिकून परत आला. तो एमडी गायनिक आहे. ही खूप आनंदाची गोष्ट आहे. त्याचं नाव कालांतराने खूप प्रसिद्ध झाले. या भागात बघायला गेलं तर शिक्षण शून्य होतं. पण अशाही परिस्थितीत ही मुले शिकली. ही संधी आम्ही त्यांना दिली. त्या संधीचं त्यांनी सोनं केलं आणि सगळ्या महत्त्वाची गोष्ट म्हणजे एवढं शिक्षण घेऊनही आमच्या सेवेसाठी ते पुन्हा इथे वळले. तिकडच्या समाजाला किंवा त्या जमातीला एकंदरीत एक अभिमान वाटावा. त्यांचे व्यक्तिमत्त्व घडले. हळूहळू त्यांना शिक्षणाबद्दल आकर्षण वाटू लागलं. या समाजातील शिक्षण घेतलेली मुलं आज विविध क्षेत्रात यशस्वी झाली आहेत. यातही आनंदाची गोष्ट अशी की, यातील ८० टक्के मुलं गडचिरोली जिल्ह्यामध्ये समाजसेवा करण्यासाठी परत आलेली आहेत. ही खूप मोठी गोष्ट. त्यांच्यामुळे त्यांना रेग्युलर वेतन मिळत आहे. त्यांचं राहणीमान सुधारतं आहे. या समाजात जे अशिक्षित आहेत त्या प्रत्येकाला वाटते की, आपल्या मुलाने आणि मुलीने शिक्षण घेतले पाहिजे. आपल्याकडे आता जवळजवळ निम्म्या प्रमाणामध्ये मुलं आहेत. साडे-सहाशे मुले. त्यापैकी अर्ध्या मुली आहेत. मुली पण मग आज डॉक्टर झाल्यात, नर्सेस आहेत. अंगणवाडी शिक्षिका आहेत. वेगवेगळ्या फिल्डमध्ये आहेत. म्हणजे आरोग्यापासून सुरुवात केली, मग शिक्षण आणि मग शिक्षणामुळे अंधश्रद्धा मुक्त करण्यासाठी कित्येक गोष्टी केल्या गेल्या. त्यामुळे अंधश्रद्धेचे प्रमाण कमी झालं. एकातून एक निर्माण होत गेलं. कुठलीही गोष्ट काहीही प्लान न करता घडत गेली. तसं पाहायला गेलं की, पैसा आला की मग आपण काम सुरू करतो. पण आम्ही पहिले काम सुरू केलं. मग त्यातून हळूहळू पैसा येऊ लागला आणि ते काम निरपेक्ष भावाने केले. लोकांनी आम्हाला मदत करायला सुरू केली. फुल ना फुलाची पाकळी हा विचार आपल्या संस्कृतीमध्ये असल्याकारणाने असंख्य लोकांनी मदत केली आणि मुळात आम्ही आमच्या गरजा खरोखरच कमी ठेवल्या होत्या आणि खरेच आम्ही काही मिस करतोय असे आम्हाला वाटत नाही. आमच्यापैकी कोणालाच आजपर्यंत असं वाटलं नाही की, आम्ही आयुष्यामध्ये काहीतरी मिस करतोय. तर अशा या शून्यातून सुरू केलेल्या कामाचा इतक्या मोठ्या जागेवर विस्तार होईल याची कधी कल्पनाही केली नव्हती. आमच्याही मुलांच्या शिक्षणाचा तसा काही प्रॉब्लेम आला नाही. आदिवासी मुलांबरोबरच ते शिकले. परंतु उच्च शिक्षण घेण्यासाठी मात्र प्रॉब्लेम आले. मोठ्या मुलाला मेडिकलला प्रवेश मिळाला नाही. परंतु त्याच्याबरोबर शिकणाऱ्या आदिवासी मुलांना मात्र प्रवेश मिळाला. एकाला तर नागपूरला मिळाला, तर एकाला मुंबईला मिळाला. तो मुंबईहून Pediatrician बनून परत आला. पण माझ्या मुलाला मात्र प्रवेश मिळाला नाही म्हणून मला थोडंसं फ्रस्ट्रेशन आलं होतं की, लहानपणी त्याला आदिवासींबरोबर शिकवून चुकी तर केली नाही ना? सुदैवाने काम चांगलं चालू होतं. त्यामुळे गुडविल निर्माण

झालं होतं. त्यामुळे वर्ध्याला एक मेडिकल प्राइवेट कॉलेज आहे; फ्रीशिप मधून त्याला ॲडमिशन मिळाली. त्यातून तो डॉक्टर झाला. एम.बी.बी.एस झाल्यानंतर त्यांनी स्वतःहून निर्णय घेतला की, आपण आई-बाबांना मदत करायची. छोटा मुलगा अनिकेत आहे. त्याने पुण्याहून पॉलिटेक्निकचा डिप्लोमा केला. त्यानेसुद्धा आपणहून निर्णय घेतला की आई-बाबांना मदत करावी. म्हणून ते दोघेही इथे आले. सुरुवातीला यांच्या लग्नाचा थोडा प्रॉब्लेम होता. त्यांचा विचार होता की, आपल्याला चांगला प्लॅटफॉर्म मिळाला पाहिजे. आई-वडिलांसारखंच आपलं आयुष्यसुद्धा योग्य व्यासपीठावर व्हायला हवं. मग त्याच्या आईने प्रयत्न केले आणि अपील केलं. त्यातून एक गोव्याची डॉक्टर मुलगी तयार झाली. ती गायनॅकॉलॉजिस्ट होती. त्यांचं लग्न कालांतराने आनंदवन मध्ये आमचं झालं तसंच साध्या पद्धतीने झालं. सुदैवाने सुनसुद्धा या कामांमध्ये एकाग्र असल्याकारणाने सर्वांच्या मदतीने ५० अत्याधुनिक सोयीसुविधा असलेले हॉस्पिटल उभारलं गेलं आणि २०१४ साली बाबांच्या जन्मशताब्दीला हॉस्पिटलच लोकार्पण केलं. त्यानंतर दुसरा मुलगा अनिकेत. त्याची पत्नी समीक्षा ही पुण्याची आहे. एम.ए. इकॉनॉमिक्स फर्स्ट क्लास आहे. ती इथे भेट द्यायला आली होती आणि अनिकेतच्या प्रेमात पडली आणि मग त्यांच्या दोघांचं लग्न इथे आनंदवनात झालं. दोघांनीही शिक्षणाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली. शिक्षणाला दर्जा देण्याकडे अनिकेत आणि त्याची पत्नी समीक्षा यांनी खूप प्रयत्न केले. शिक्षणात मोठ्या प्रमाणात बदल केले, बारावीपर्यंत आपल्याकडे शाळा आहे. पण या सगळ्यांचा शिक्षणातला विकास बघून बाकीच्या आदिवासींना असं वाटलं की, आपल्या सगळ्या मुलांना जर तुम्ही प्रवेश देत नाही आहात तर दुर्गम भागामध्ये तुम्ही दुसऱ्या शाळा काढाव्यात. किती लोकांना माहिती असेल? नेलगुंडाला लोकांच्या आग्रहास्तव एक शाळा उभारण्यात आली तिथे आजही रस्ते नाहीत, आजही तिथे पावसाळ्यामध्ये जाऊ शकत नाहीत, वीज नाही; पण सगळ्या पालकांना असे वाटते की आपल्या मुलांनी शिकले पाहिजे. पाच वर्षांपूर्वी शंभराच्या संख्येने पालक आमच्या दोघांकडे आले आणि तुम्ही तिथे शाळा सुरू करा हा त्यांचा आग्रह होता. तिथे शाळा सुरू केली. गावकऱ्यांनी आपली ११ एकर शेतीची जागा भाड्याने दिली आणि आश्चर्य वाटेल तुम्हाला की, तिथे आधीपासून जिल्हा परिषदेशी शाळा आहे; त्याची बिल्डिंग पण आहे, तिथे शिक्षकही आहेत आणि एवढं असूनही तिकडे मुलं नाहीत! मग कुठेतरी काय चुकतंय ते आपल्याला समजत नाही. त्याच्यावर विचार करण्याची गरज आहे. सरकारच्या तिथे फॅसिलिटी असताना गावकऱ्यांनी आमच्या मागे लागणं हे खरंच आश्चर्य वाटणारं होतं. मग आमच्या अनिकेत आणि समीक्षाने फेसबुकवरती अपील केलं आणि त्यातून काही चांगल्या उच्चशिक्षित मुलांना, 'इथे एक वर्ष मुलांना शिकवण्याची संधी आहे तुम्ही इथे येऊ इच्छिता का?' असे अपीलमध्ये होतं. आनंदाची गोष्ट. १५ आयटीच्या मुला-मुलींनी सहभाग दाखवला. त्यातील तीन मुला-मुलींना यांनी सिलेक्ट केलं आणि पाच वर्षापूर्वी त्यांनी हा दिवस, ही तारीख गावकऱ्यांना दिली होती की, आम्ही या तारखेला शाळा सुरू करणार आहोत. तो दिवस गावकऱ्यांनी लक्षात ठेवला आणि अखेर तो दिवस आला. अनिकेत आणि समीक्षा शाळेजवळ पोहचतात आणि पाहतात तर काय, झाडाखाली छप्पन मुलं-मुली त्या गावात झाडाखाली येऊन बसले होते! आमची सुनबाई पुण्याची आहे. तिला कालांतराने कळलं की आदिवासी लोकांची माडिया भाषा आहे. त्यामुळे त्यांना मराठी शिकणे खूप जड जाते. शिक्षकांना मुळात आधी माडिया शिकायला पाहिजे. सुदैवाने आमचे सर्व शिक्षक शिकलेले होते. पण नवीन शिक्षकांनी शिकवायचं झालं तरी २ वर्ष अशीच जाणार. कारण ती फॉरेन लँग्वेज झाली त्यांच्यासाठी. ती म्हणाली की, ''आपण येथे मग इंग्लिश मीडियम चालू करू या त्यांच्यासाठी. ती पण फॉरेन लँग्वेज राहील. पण हा एक प्रयोग करू या, मराठी आणि इंग्रजीमध्ये काय त्यांना सोपे जाते ते पाहू या.'' आनंदाची गोष्ट अशी की, त्यांनी इंग्लिश फार

लवकर पिकप केले. इतक्या सुंदर पद्धतीने आज ते शिक्षण घेत आहेत. अगदी सीबीएससी शिक्षण घेत आहेत. शिकवायला उच्चशिक्षित मुलं-मुली आहेत. पण खूप आनंदाची गोष्ट अशी की, शहर सोडून अशा दुर्गम भागांमध्ये ते आज येऊन शिक्षण देत आहेत. जवळपास शाळेमध्ये आजच्या घडीला दीडशे मुलं-मुली आहेत. त्याचबरोबर दुसरे गाव आहे जितगाव. तिथे अनिकेतची त्या गावच्या सरपंचाशी ओळख झाली. तो सुद्धा एक प्रगत शेतकरी होता. तो अनिकेतला म्हणाला की, ''आमच्या गावात तलाव पण नाही आहे. त्यामुळे पाण्याची टंचाई जाणवते. म्हणजे फक्त कागदावर असतात तलाव तसे तलाव आहेत. मात्र पाणी नाही. तर तुम्ही आमच्यासाठी तलाव करून द्याल का?'' मग अनिकेतने मिटींग घेतली. त्यात त्याने गावकऱ्यांना विचारले, 'तुमचा सहभाग काय राहील? सबसिडी बद्दल काय करायचं?' मग गावकऱ्यांनी मीटिंग करून पंधरा टक्के पैसे गोळा केले आणि दहा लाखाचा तलाव अनिकेतने त्यांच्यासाठी बनवून दिला. पाच वर्षापूर्वी करून दिलेला तलाव एकदा भरला की त्यातलं पाणी कधी आटत नाही. त्याच्यामध्ये मत्स्यशेतीला सुद्धा सुरुवात केली. जमिनीमध्ये पाणी शिरल्यामुळे वॉटर टेबल वाढू लागला. त्यानंतर तिथे भाजीपाला शेती होऊ लागली. हळूहळू गावाचा विकास होत गेला. बघा! एका तलावामुळे सगळी स्थिती बदलली. मग परत त्यांनी छोटीशी टाकी बनवून देण्याची मागणी केली. गावात टाकीसाठी आम्ही कॉन्ट्रॅक्ट करू असंही गावकऱ्यांनी सांगितलं. अस करत करता आजूबाजूच्या सगळ्या गावांमध्ये याची ख्याती झाली आणि तेही बोलायला लगाले की, 'आमच्या गावांमध्ये या सुधारणा करून द्या.' असं करता करता २२ गावांमध्ये तलाव झाले! बांधले. लोकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे. नंतर 'आमच्या गावांमध्ये तुम्ही अजून एक शाळा सुरू करा' अशी मागणीही गावकऱ्यांनी केली. मग त्यांच्या आग्रहाखातर मागच्या वर्षी तिसगावला एक नवीन शाळा सुरू केली. त्याला 'साधना विद्यालय' असं नाव दिलं. आज पहिली पन्नास मुलं आहेत. कारण पहिल वर्ष आहे. या सगळ्या कार्यामध्ये बाबांच्या विचारांची एक वेगळी प्रेरणा आहे. त्यामुळे हे काम निरपेक्ष भावनेने, निष्ठेने करण्यासाठी आजही आम्ही तत्पर आहोत. आमच्या नातवंडांनासुद्धा त्यामुळे भूतदया, समाजसेवा याबद्दल प्रेम आहे. आमचा पहिला नातू अर्णव हा देखील वन्यप्राण्यांबरोबरच खेळताना तुम्ही पाहिला असेल. त्यालाही त्यांच्याबद्दल आत्मीयता आहे. तशी सर्वच नातवंड आजही आमच्याबरोबर विविध गोष्टींमध्ये सहभाग घेतात. सांगायला एक आनंदाची बाब वाटते ती म्हणजे माझ्या दोन्ही शहरातल्या सुना असूनही हा एक मोठा निर्णय घेतलाय की आपल्या मुलांनी आदिवासी मुलांबरोबरच शिकावं. आजच्या काळामध्ये असा विचार हा खरंच खूप वेगळा आणि मोठा वाटतो. एक वेगळा कॉम्प्रमाईज आहे. या सगळ्यात आम्ही खूप भाग्यवान आहोत. अशाप्रकारे कामाचा विस्तार झाला. समाजामध्ये जनजागृती झाली. फेसबुकमुळे जग अजून जवळ आलं. कामाबद्दल लोकांना अधिकाधिक समजलं. आमच्या वेळेस २२ वर्षे वीज नव्हती! परंतु आता मुलांमुळे आणि या फेसबुक आणि इतर माध्यमांद्वारे संपूर्ण जगापर्यंत आमचं काम पोहोचलं. आज ही ख्याती सगळ्यांपर्यंत पोहोचल्यामुळे तरुण मुलांना, शहरातल्या मुलांनासुद्धा इथे येऊन काम करण्याची इच्छा वाटते. लॉकडाऊनच्या काळामध्ये मोठ्या प्रमाणात आम्हाला निमंत्रणं येत होती. विविध कॉलेजची विशेष म्हणजे आजची तरुण मुले आग्रह करायची ही खूप आनंदाची बाब आहे. महाराष्ट्राच्या विविध ठिकाणी बाबांपासून प्रेरणा घेऊन छोट्या छोट्या संस्था स्थापन झाल्या आहे. त्यांनासुद्धा समाजाच्या पाठिंब्याची गरज आहे. लोक मला विचारतात की, तुम्ही आम्हाला काय सल्ला द्याल? तर मी त्यांना नेहमी सांगतो की, बाबांनी जर मला लहानपणी हा दुर्गम भाग दाखवला नसता तर आपल्याला आदिवासी बांधव असे राहतात हे कळलंच नसतं. त्या आदिवास्यांचं आयुष्य जनावरासारखं आहे. त्यामुळे समजायला एक्स्पोजर खूप महत्त्वाचे आहे. कारण आपले आयुष्य

जगत असताना आपला देश इतका मोठा आहे की त्यात आदिवास्यांच्या आयुष्याकडेही जर आपण थोडंसं अभ्यासपूर्वक दृष्टीने पाहिलं तर त्याचा परिणाम सबकॉन्शनस माईंडमध्ये आपल्यावरती होत असतो आणि मग त्यातूनच नवनवीन कामं घडत असतात. प्रत्यक्ष काम करू शकलो नाही तरी अशा ठिकाणी विविध समाजकार्य सुरू आहेत. तिथे निदान आपण मदत तरी करू शकतो. फुल ना फुलाची पाकळी आपण देऊ शकतो. वेगळ्या प्रकारे आपण तरुणांना असं प्रोत्साहन द्यायचा प्रयत्न करतो की, तुम्ही विविध कामं येथे करू शकता. फुल टाइम काम करण्याचे सर्वांना शक्य नाही परंतु त्यांचे मोरल टिकून ठेवण्यासाठी अशा संस्थांना आपण भेटी दिल्या. प्रत्येक वेळेस आर्थिक मदत केली पाहिजे असं काही नाही; पण भेटी देऊन त्यांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप दिली तर यांचा मोरल त्यामुळे टिकून राहील. आमच्या दोघांचेही आयुष्य खडतर होतं, नाही असं नाही. पण आम्ही मानलं नाही म्हणून त्याचा मला त्रास नाही झाला. त्यामुळे एका प्रकारचं समाधान. आज पन्नास वर्षे जवळजवळ होतील आमच्या कामाला. पण हे समाधान आमच्याकडे तरीही टिकून आहे. समाजाने लोकांनी भरभरून प्रेम केलं. कधीकधी या सगळ्या गोष्टी पाहिल्या की प्रश्न पडतो की, ते पचवायची आपली पात्रता आहे की नाही? बराच वेळ प्रदीर्घ काळ काम करणं हे तुम्हा सर्वांच्या प्रेमामुळे शक्य झालं आहे.

• बऱ्याच माहितीपटामध्ये आणि मुलाखतीमध्ये सुद्धा आम्ही तुमचं प्राणी प्रेम, तुम्ही ज्याप्रकारे प्राण्यांबरोबर खेळता, ते पाहिलं व ऐकलं आहे. अगदी म्हणायचं झालं तर पसायदानातील ''भूता परस्परे घडो मैत्र जीवांचे'' ही ओळ आठवते. तर ती नेमकी सुरुवात कशी झाली?

तिथे जाईपर्यंत आम्हाला फारसं माहिती नव्हतं त्यांच्या आयुष्याबद्दल. आपल्याला फक्त एवढंच ठाऊक आहे की, ती कंदमुळे आणि शिकार यांच्या भरवशावर जगतात. ते शिकारीमध्ये काय खात असतील हे इथे आल्यावर नंतरच आम्हाला समजलं. म्हणजे एकदा तर असं झालं की, आम्ही आमचं धान्य साठवून ठेवण्यासाठी, धान्य म्हणजे डाळ आणि तांदूळ, एक टेम्पररी गोडाऊन बनवलं होतं. नेहमी त्यात उंदीर येऊन धान्याची खूप नासाडी करायचे, धान्य खायचे. त्यासाठी नागपूरहून एक पिंजरा आणला उंदीर पकडण्यासाठी. त्याला आमच्या गोडाऊनमध्ये ठेवलं. तसे उंदीर मिळाले. त्यांना कित्येकदा जलसमाधी दिली जायची. एकदा जलसमाधी द्यायला मी तो पिंजरा घेऊन चाललो होतो आणि तेवढ्यात काही आदिवासी मंडळी दवाखान्यामध्ये आले होते. त्यांच्या बरोबर दोन लहान मुलं होती त्यांनी उंदीर बघितल्यावर ते आम्हाला ते आम्हाला म्हणाले कुठे घेऊन चालले म्हणून. त्यांना सांगितलं की, गोडाऊनमध्ये सापडले आहेत, त्यांना जलसमाधी देणार आहोत. ते लगेच त्यावर बोलले की, 'नाही. तुम्ही आम्हाला आमच्या मुलांना खायला देण्यासाठी द्या.' त्या क्षणी आम्ही थबकलो. पण आम्ही त्याला सिरियसली घेतलं होतं. त्यांची परिस्थिती काय असावी हे तिथे आम्हाला समजलं. एकदा फिरायला जाताना आम्हाला एक हंटिंग पार्टी अचानक भेटली. त्यांनी माकडे मारली होती. शक्यतो हिंदू धर्मामध्ये गाय आणि माकडाला कोणी मारत नाही. पण जवळून ज्यावेळेस ते पाहिलं त्यावेळेस ती लाल तोंडाची माकडे होती. त्यांचे हात पाय बांधलेले होते व त्यांना बांबू कावड वरती घेऊन जात होते. जवळ गेल्यावर लक्षात आलं की, माकडाचं जिवंत पिल्लू त्या मेलेल्या आईचे दूध पीत होतं. घाबरून तिला चिटकलेलं होतं. आम्हाला मग रहावलं नाही. आम्ही त्यांच्याशी बोललो की, 'पिल्लू आम्हाला द्या.' तर ते म्हणाले आमची मुलं नाहीतर उपाशी राहतील. भूक म्हणजे काय असते ते तेव्हा आमच्या लक्षात आलं. तेवढ्यात आम्हाला कल्पना आली की, आपल्या कडील धान्य आपण त्यांना द्यावं. त्यांना मग आमच्याकडील धान्य देऊन कसंबसं त्या पिल्लाची सुटका केली. पहिले त्याला घरी घेऊन आलो. बाटलीच्या दुधावरती माकडाची भूक भागवली जाऊ

लागली. मग एक गावठी कुत्राही आमच्याकडे आणला होता. खरं बघायला गेलं तर माकड आणि कुत्रा वैरी असतात. परंतु आमच्याकडे या दोघांची दोन दिवसात मैत्री झाली. तो कुत्रा माकडाच्या पिल्लाला पाठीवर घेऊन आमच्याबरोबर फिरायला यायचा. हे बघितल्यावर आदिवासींना थोडं आश्चर्य वाटलं की, हे शत्रू एकत्र कसे आले! दवाखान्यात माणसं आली की ते हे पाहून थबकायचे. मी त्यांना सांगायचो की, असं कोणतंही अनाथ पिल्लू तुम्हाला मिळालं तर तुम्ही त्याला न मारता इथे घेऊन या. आपण त्यांना वाढवू, मोठं करू आणि त्याच्या बदल्यात आम्ही तुम्हाला अन्न देऊ. मग कालांतराने दुसरं एक हरणाचे पाडस आलं. तसं बघायला गेलं तर लहानपणी सगळीच पिल्लं सुंदर असतात. कुत्रा, माकड, हरीण आमच्याबरोबर फिरायला यायचे. अशाप्रकारे आमच्या कुटुंबाचा विस्तार व्हायला लागला. कारण हे सगळे वन्यजीव घरातच राहायचे आमच्या. मग अस्वलाचं पिल्लू आलं ते सुद्धा बॉटल फिडिंगवर मोठं होऊन आमच्यातलं एक झालं. आमच्या दोघांसाठी या प्राण्यांबरोबर फिरायला जाणं हा एक विरंगुळा असायचा. त्रिवेणी संगमावर आम्ही सगळे प्राण्यांसहीत फिरायला जायचो. त्यानंतर बिबट्याचे पिल्लू देखील आले. ते सुद्धा आमच्याबरोबर येऊ लागलं. या सगळ्या प्राण्यांना घेऊन भररस्त्याने निघायचो. कधीतरी आदिवासी आम्हाला येताना पाहून थोडे थोडे घाबरायचे. सहाजिकच आहे. ते लपून राहायचे. पण त्यांच्याकडे प्राण्यांचे काही लक्ष नसायचं. प्राण्यांची आमच्या मुलांशीही दोस्ती झाली. आमच्या आरती (छोटी मुलगी) बरोबरचं एक उदाहरण मी नेहमी सांगतो की, तिचं वजन हे पावणेदोन किलो होतं आणि त्याच वेळेला नेगल आला (बिबट्याचे पिल्लू). त्याचं वजन अर्धा किलो होतं. बॉटल फिडिंगने त्याला मोठं केलं. नंतर त्याला मांसाहार चालू केला. तेच त्यांचं नैसर्गिक खाद्य होतं. मेलेली जनावर आणायची आणि मग ती कापून त्याला खायला द्यायची आणि केरोसीनचा फ्रिज आमच्या विलास मनोहरने आणला होता. फ्रिजमध्ये वरती मांस ठेवायचं, खाली मुलांच्या दुधाची सोय, दही आणि मग खाली सिरींज, व्हॅकसीन असायच्या. वर्षानंतर आम्ही कुतूहल म्हणून वजन केलं. तर आरतीच वजन पावणेदोन किलो पासून आठ किलो आणि नेगलचं वजन अर्धा किलो पासून ते ४० किलो ४२ किलो होते. एका वर्षामध्ये वजन ४२ किलो एवढं झालं. तसं पाहायला गेलं तर त्यांचे आयुष्य कमी असतं. चौदा-पंधरा वर्षे. फार फार झोपतो तर तो जगतो. आरतीची आणि त्याची इतकी मैत्री होती की, ती त्याच्या पाठीवर बसायची घोडा घोडा करायची. कान ओढायची. असोसिएशनमध्ये हे प्रेम निर्माण होतं. त्यांनी तिला कधी नखसुद्धा नाही मारलं. त्यांनी जर प्रेमाने पंजा मारला तर आपल्या स्किनवर पाच ओरखडे उठतात. तिथून रक्ताची धार लागते. कित्येकदा खेळता-खेळता आपलाच माणूस समजून त्यांनी मला एकदा प्रेमाने पंजा मारला होता. अक्षरशः रक्ताची धार लागली होती. जिथून रक्त वाहत होतं. ती जखम त्याच्या तोंडासमोर पुढे केले. त्यांनी चाटून रक्त थांबवलं. आपल्याकडे एक असा चुकीचा समज आहे की, जंगली श्वापदांना रक्ताची चटक लागते म्हणून. त्यामुळे आम्हाला प्रयोग करून बघायचा होता. ते जसे स्वतःच्या जखमा चाटून बऱ्या करतात तसंच त्यांनी मला त्यांच्यातलं समजलं होतं म्हणून माझ्याही जखमा चाटून त्यांनी बऱ्या केल्या. नंतर मी कधीही अँटिबायोटिक घेतले नाहीत. त्यांच्या चाटण्यामुळे माझ्या बऱ्याच जखमा बऱ्या झाल्या आणि चटकही त्यांना लागली नाही हेही विशेष! त्या वरून हे सिद्ध झालं की, रक्ताची चटक लागणं हा विचार खरा नाही. पहिल्यांदा ज्या वेळेस ते माणूस मारतात त्यावेळेस त्यांना समजतं की, माणूस मारण हे हरीण मारण्यापेक्षा सोपं आहे. कारण माणसाला काही नखं नाहीत, सुळे नाहीत, त्याचं स्वतःचं रक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात धावता येत नाही. फक्त तो सुरुवातीला माणसाला घाबरतो कारण तो त्याच्यापेक्षा उंच असतो, रंगीबेरंगी कपडे घातलेले असतात. मग तो त्याला मारण्यासाठी पुढे धावतो. तर अशा पद्धतीने प्रयोग मी धरी करून बघितले. त्यावेळेस

मला कधी जखमा झाल्या नाहीत असे नाही. बरेचदा रक्त यायचं कारण आपली स्किन नाजूक असते. पण त्यांनी इंटेन्शनली कधी मला इजा पोहोचवली नाही. विलास मनोहर यांनी जे 'नेगल' पुस्तक लिहिलं ते आमच्या कामापेक्षा जास्त गाजलं. लोकांना ती उत्सुकता होती की, हे क्रूर प्राणी इतक्या प्रेमाने कसे वागतात. एक सुंदर पुस्तक त्यांनी लिहिले, उत्तम वर्णन त्यांनी त्यात केले आहे. त्यामुळे ते त्या काळात ते खूप पॉप्युलर झालं. ते पुस्तक ग्रंथालीने प्रकाशित केलं. त्याच्यामध्ये जे प्राणी आहेत ते पाहण्यासाठी विजिटर यायला लागले. इथे प्राणी इतक्या प्रेमाने वागत आहेत म्हणजे काहीतरी गडबड असणार असा उद्देशही काही दिसत असायचा! त्यामुळे काही लोक उत्सुकता म्हणून येतात, तर काही लोकं आपल्या मनाची शंका दूर करण्यासाठी येतात. पण हे सगळे प्राणी तरस, साप, अस्वल. पण सुदैवाने त्यांनी कधीही त्रास दिला नाही. माझ्याबरोबर जर पिंजऱ्यामध्ये नातवंड आली तर तीही माझ्याप्रमाणे त्यांचे आपले असल्यासारखीच वागायचे. तुम्हाला ठाऊकच आहे. माझा नातू अर्णव आणि सापाची खूप घट्ट मैत्री आहे. तो गळ्यामध्ये हातामध्ये साप घेऊन फिरतो. माझी छोटी नात आहे ती सहा महिन्यांची असल्यापासूनच माझ्याबरोबर यायची, प्राण्यांना पाहायची तरसासमोर बसून त्याच्या मिशा ओढायची! मोठी झाल्यावर ती मला बोलायची, 'आजोबा तुमच्या मिशा किती लहान आहेत आणि तरसाच्या मिशा किती मोठ्या आहेत!' ह्या सगळ्या गोष्टी ऐकून लोकांना खरंच आश्चर्य वाटायचं की, हे सगळे प्राणी इतक्या प्रेमाने कसे वागतात? त्यानंतर सरकारचे ऑब्जेक्शन आलं की, तुम्ही प्राणी पाळू शकत नाही. मी म्हटलं 'आपण जर हे प्राणी नसते पाळले तर आदिवासींनी त्यांना मारलं असतं. या शिकारीपासून दूर व्हावं आणि जनजागृती घडावी म्हणून आपण त्यांना शिक्षण दिलं पाहिजे. शिक्षणामुळे नोकऱ्या लागल्या. त्यामुळे हळूहळू जंगलात जाऊन शिकार करणं कमी झालं. जवळ जवळ बंद झालं. आता प्राणी आपल्याकडे जवळपास शंभराहून वर आहेत ते आता डिपेंडंट झालेत. ह्यूमनाईज झाले आहेत. कारण जंगलात वावरण्याचा आत्मविश्वास या प्राण्यांना त्यांची आई देते. वाघाला तर त्यांची आई दोन वर्ष आपल्याबरोबर ठेवते. त्याच्यातला आत्मविश्वास देते आणि मग त्याला ती सोडते. नाईलाजाने मी म्हणतोय कित्येकदा त्यांना तो आत्मविश्वास आपण देऊ शकत नाही. म्हणून त्यांना आमच्या कुटुंबामध्ये आम्ही ठेवले आहे. निदान त्यांना चांगलं आयुष्य देता येईल. ती लोकं आनंदाने राहतात. आजही आम्ही बाहेरून कुठून आलो की ते आमची वाट बघत असतात. आधी ती सर्व मोकळीच होती. त्यामुळे प्रश्नच नव्हता. पण आता शाळेमध्ये कोणी मुले आली तर त्यांना हानी पोहोचू नये म्हणून त्यांना पिंजऱ्यात ठेवावे लागतात.' मी आज सुद्धा सकाळी वाघाबरोबर शेतामध्ये एक राऊंड घेऊन आलो. लॉकडाऊनच्या आधी नगर जिल्ह्यातून महाराष्ट्र सरकारने दोन बिबट्याची पिल्लं पाठवली. एक दहा महिन्याचा एक १८ महिन्याचे. आता ते बरेच मोठे झालेत. लॉकडाऊनमुळे कोणी माणसं नसल्यामुळे शेतामध्ये मागे मोकळे असते. आम्ही रोज सकाळी तिथे फिरायचो. त्यांना आम्ही कधी दोरखंडाने बांधून नाही ठेवले. सकाळी त्रिवेणी संगमावर मंदाकिनी बरोबर एक माझी फेरी असते आणि त्यानंतर दुसरी फेरी या सगळ्या प्राण्यांबरोबर असते. आजसुद्धा माणसाचा आणि वन्य प्राण्यांचा संघर्ष खूप पराकोटीचा आहे असं आपण म्हणतो, त्याचं कारण असं की, जंगल कमी झाले. जंगलामध्ये त्यांचे असणारे खाद्य तेसुद्धा आपण कमी केले. आता सरकारमान्य असल्यामुळे नगर जिल्ह्यातील दोन्ही बिबट्याची पिल्ले सरकारने आमच्याकडेच सोपवली. आता त्या पिल्लांना सुदैवाने लॉकडाऊनमुळे थोडंसं मोकळं बाहेर फिरता येत आहे. जंगलात ते आनंदाने घडले असते त्या प्रकारे त्यांना आनंद देण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. आनंद याच गोष्टीचा वाटतोय की, आता आम्ही दोघेही पंच्याहत्तरीला पोहोचत आहोत. तरीसुद्धा तरुण वयामध्ये ज्या गोष्टी आम्ही केलेल्या

सौंदर्य म्हणजे नाक नसलेला सुगंध.

आहेत; त्या गोष्टी आजतागायत आम्ही करतोय.

• नेगल या पुस्तकाचा तुम्ही उल्लेख केलात. विलास मनोहर यांनी लिहिलेलं हे पुस्तक खरंच प्रेरणा देणारे आहे आणि कित्येक वर्षे ते तुम्हाला सहकार्य करत आहेत. असे अनेक सहकारी तुम्हाला तुमच्या प्रकल्पांमध्ये लाभले. तसंच आताच्या ह्या नवीन पिढीलाही त्याच्यामध्ये सहभागी व्हायचं असेल. आज आता या फेसबुक आणि विविध माध्यमांतून अनेक विद्यार्थी निश्चित या प्रकल्पासाठी एक पाऊल पुढे टाकतील. तर आम्हालाही महाविद्यालयातर्फे जर अशा पद्धतीने तुमच्याशी जोडायचे असेल तर नक्की काय आम्ही करायला हवं ?

आपल्या प्रकल्पाची वेबसाईट आहे. लोकबिरादरी प्रकल्पाची माहिती त्यात दिलेली आहे. कशाप्रकारे संपर्क करावा? हे त्यातून तुम्हाला कळेल. ईमेलवर तुम्हाला आधी सुरुवात करता येईल. अगदीच डिटेल माहिती तुम्हाला अपेक्षित आहे ती सगळी माहिती त्यावर उपलब्ध आहे. सांगायचं झालं तर या सगळ्या ॲडमिनिस्ट्रेशनमधून मी निवृत्त झालेले आहे. आमचा कनिष्ठ चिरंजीव अनिकेत फेसबुक आणि या सगळ्या गोष्टी पाहतो आणि आजकाल तंत्रज्ञान इतके पुढे गेले आहे की, सर्वजण एकमेकांशी सहज जोडली गेलेली आहेत. शिक्षणाबद्दल तुम्हाला काही जाणून घ्यायचं असेल तर समीक्षा आमची सून, तिचिही शिक्षणाबद्दल विविध व्यासपीठांवर व्याख्यानं झालेली आहेत. त्यांचे स्वतंत्र असे कार्यक्रम वेगवेगळ्या ठिकाणी होत असतात.

आज आणखी एक मेसेज मोठ्या लोकांसाठी आहे– ह्या तरुणांनी आपल्या अंगावर एखादी जबाबदारी घेतली असेल तर त्यांना ती करू द्या. आम्ही दोघांनी असं ठरवलं आहे की, त्यांनी विचारल्याशिवाय आपण सल्ला देऊ नये. ते त्यांच्या पद्धतीने काम करत आहेत, आम्ही आमच्या पद्धतीने केली आहेत. बाबांनी आम्हाला मोकळीक दिली होती. तसं आपलं दडपण त्या मुलांवर देऊ नका. त्यांना हवं तसं काम करू द्या. त्यामुळे आम्ही आमच्या तर्फे असा निर्णय घेतला आहे की, कामातून शंभर टक्के withdraw होण्याचा प्रयत्न करतोय आणि या प्रयत्नांनी आम्ही या गोष्टीमध्ये यशस्वी झाले आहोत. याचा आनंद पण आम्ही घेत आहोत. हा मेसेज पण आहे तुम्हा सर्वांसाठी. त्यामुळे मुलांनी आपल्या मनाप्रमाणे सगळे केलं पाहिजे या गोष्टी थोड्या बाजूला ठेवून मुलांना काय वाटतंय हे महत्त्वाचे आहे.

• सामान्यतः पाहायचं झालं तर सर्वसामान्य कुटुंबामध्ये, आमच्या घरामध्ये विविध विषयांवर चर्चा होतात. पण त्या चर्चा फार फार तर राजकारण, समाजकारण या पुरत्या सीमित असतात. पण तुमच्याकडे तर समाजसेवा, प्राणिप्रेम. तुमच्या तीनही पिढ्या आज या क्षेत्रात आहेत. तुमच्या सुनाही तुमच्या कार्यात तुम्हाला मदत करत आहेत. मग सासू आणि सून अर्थात तुमचं आणि त्यांच्या मध्ये कशा प्रकारच्या चर्चा होत असतात ?

सुना काय मुलीसारख्या आहेत. तसं सांगायचं झालं तर त्या आपापली कामं आपापल्या पद्धतीने आणि खूप चांगल्या तऱ्हेने करतात. त्यामुळे त्यांच्या कामामध्ये आमचा त्यांना फुल सपोर्ट असतो. आमचं एकत्र कुटुंब आहे. आम्ही दहा जण एकत्र राहतो. सकाळचा नाष्टा हा आमचा सगळ्यांचा एकत्र असतो. नंतर दुपारचं जेवण कॉमन मॅटमध्ये असतं. नातवंडांनाही आम्ही आमच्या बरोबरच तिकडे एकत्र जेवायला नेत असतो. कधी समजा जर मुलांच्या वेळा जमत नसतील तर मग मेसमधून डबा येतो आणि मग मुले आपापल्या वेळेत जेवतात. कारण शाळेच्या वेळा. त्यांच्याप्रमाणेच पुढचं ठरवावे लागते. त्यानंतर मुलं हॉस्पिटल मधून आली की त्यांना त्यांच्या वेळेमध्ये जेवण दिलं जातं. त्यामुळे कधीकधी वेगवेगळ्या पद्धतीने जेवणाच्या वेळा असतात. आता सध्या थोडीफार आम्ही अशी सर्वांना मुभा दिली आहे की, प्रत्येकाला आता क्वार्टर दिल्यात. तुम्ही आपल्या मुलांना घरी वेगळं असं करून काही खाऊ घालू शकता. बाकी कॉमन किचेन आहेच. या भागांमध्ये

फार काही मिळत नव्हतं. परंतु आता थोडेफार मिळाला लागलेले आहे. त्यामुळे आता थोडी फ्री असल्यामुळे नातवंडांना त्यांच्या आवडीचे बनवून देते.

• गडचिरोली आणि छत्तीसगड इथे आढळणारे माडिया गोंड आणि चंद्रपूर आणि बाजूच्या तेलंगणामध्ये आढळणारे माडिया गोंड यांच्या जीवनशैलीत व संस्कृतीत काही फरक आहे का? तुम्ही चांगले लेखक आहात. लेख लिहिताना तुम्ही स्वतः लिहिता की डिक्टेशन देतात. रानमित्र व प्रकाशवाटा यानंतर अजून काही लिहिण्याचा मानस आहे का ?

छत्तीसगड आणि महाराष्ट्राचे माडियी आदिवासी हे एकच आहेत. खरंतर चंद्रपूर आणि तेलंगणामध्ये ती थोडीशी प्रगत आहेत. पण गरिबी ही आहेच. फक्त इकडे आपल्याकडे जास्त आणि तिकडे तुलनेने थोडी बरी आहे. लिहिण्याचं बोलाल तर मला नाही जमलं. मी सगळे डिक्टेशन केले दोन्ही पुस्तकासाठी. प्रकाशवाटा पुस्तक समकालीन प्रकाशन यांनी प्रकाशन केलं. त्याचा प्रतिसाद खूप चांगला आला. त्या पुस्तकावरून प्रेरित होऊन खूप लोकांनी समाजकार्याकडे एक पाऊल पुढे टाकले आहे, गांभीर्याने विचार केलेला आहे.

• साधना आमटे यांनी समिधा हे आत्मचरित्रपर पुस्तक लिहिले. तसं तुमचा पुस्तक लिहिण्याचा काही मानस आहे का?

माझा काही असा विचार नाही पुस्तक वगैरे लिहायचा. कारण मी काही लेखिका नाही. या कामातच मी जास्त गुंतलेली असते. रमते.

• या सर्व कार्याव्यतिरिक्त काही विविध प्रकल्प तुम्हाला हाती घ्यायचे आहेत का? अजून असं काही काम राहिले किंवा करू इच्छित आहात का ?

Proudly speaking आदिवासी यांची लोकसंख्या जवळपास दहा कोटी आहे. तुमच्यात इथेही ठाणे जिल्ह्यात पालघरमध्ये कमी-जास्त प्रमाणामध्ये ही संख्या आहे. पण परिस्थिती मात्र तशीच आहे. बऱ्याच ठिकाणी कामं सुरू झालेली आहेत. पण आम्हाला असं वाटतं की, त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा. एकीकडे आपण महाशक्ती, महाशक्तीशाली, प्रगत देश असं आपण म्हणतो; पण जोपर्यंत आपण या तळागाळाच्या लोकांना, आदिवासींना वर आणत नाही तोपर्यंत हे शक्य नाही. दुर्गम भागात असल्यामुळे त्यांना आपण सगळ्या सोयीसुविधा नाही पोहोचवू शकत. हे खरंतर आपले दुर्भाग्य आहे किंवा आपण कुठेतरी कमी पडतोय. या गोष्टीसाठी ही जागृती व्हावी. समाजात आमच्या मुलाखतीचा आणि व्याख्यानाचा उपयोग समाज प्रबोधनासाठी आणि लोकांमध्ये आणि आदिवास्यांप्रति सद्भावना जागृत व्हावी की हेही आपले बांधव आहेत त्यांच्यासाठी काहीनाकाहीतरी मदत करायला पाहिजे. मी एकटा काय करू शकणार असं प्रत्येकाला वाटतं, पण ती पळवाट आहे. पण आपण सुरुवात तर करू शकतो हे तर आपल्या हाती आहे.

झेपावणाऱ्या पंखांना क्षितिजं नसतात
त्यांना झेपेच्या कवेत येणारे आकाश असतं.
सृजनशील साहस यांना सीमा नसतात
त्यांना मातीच्या स्पर्शाची अट असते.
अशी सृजनशील साहसे हवी आहेत,
जी बीजे पेरून वाट पाहू शकतील,
ते भाग घेऊन भविष्य आखतील
अन् बेभान होऊन वर्तमान घडवतील.

– बाबा आमटे

**– गौरी अनिरुद्ध गोरेगावकर**
बी.एम.एम., तृतीय वर्ष,
जोशी बेडेकर महाविद्यालय

●●●

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**६ ऑगस्ट २०२१ – दीपपूजा**

आषाढ महिन्यातील अमावस्या ही दीप अमावस्या म्हणून साजरी केली जाते. प्रकाश देणाऱ्या दिव्याची पूजा व प्रार्थना या दिवशी केली जाते. मुलांना दिव्याचे चित्र दाखवून याबद्दलची माहिती शिक्षकांनी दिली.

**१३ ऑगस्ट २०२१ – नागपंचमी**

श्रावण महिन्यातील पाचवा दिवस म्हणजे नागपंचमी. मुलांना नागांच्या विविध जातीची माहिती चित्राद्वारे करून देण्यात आली. नागाला शेतकऱ्याचा मित्र का म्हणतात याविषयी शिक्षकांनी मुलांना माहिती दिली.

नर्सरी, ज्यूनियर व सिनीयरच्या मुलांनी चिकणमातीपासून (Clay) विविध आकारांचे साप बनवले. सिनीयर के. जी.च्या मुलांना प्रथम विविध सापांची चित्रे दाखवण्यात आली व नंतर मुलांनी वहीत नागाची चित्रे काढली.

**स्वातंत्र्य दिन**

भारताचा ७५ वा स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट २०२१ रोजी दिमाखात साजरा झाला.

१३ ऑगस्ट मुलांना झेंड्याचे रंग असलेले कपडे परिधान करायला सांगितले होते. शिक्षकांनी स्वातंत्र्य दिनाची थोडक्यात माहिती दिली. राष्ट्रगीताचा व राष्ट्रध्वजाचा आदर करण्यास सांगितले.

सिनीयरच्या प्रत्येक गटातील ४ विद्यार्थ्यांना नेते व स्वातंत्र सैनिक यांची वेशभूषा व माहिती इ. असे विषय देण्यात आले होते. मुलांनी उत्तम सादरीकरण केले.

**२० ऑगस्ट २०२१ – नारळी पौर्णिमा / रक्षाबंधन**

रविवारी २२ ऑगस्टला येणारा रक्षाबंधनाचा सण गेल्या शुक्रवारी २० ऑगस्ट रोजी आभासी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने घेतल्या जाणाऱ्या वर्गात साजरा केला. मुलांनी या दिवशी नवीन कपडे घातले होते.

श्रावण महिन्यातील पौर्णिमा ही नारळी पौर्णिमा म्हणून साजरी करण्यात येते. कोळी बांधवांचा अतिशय महत्त्वाचा असा हा सण व भावा-बहिणीचा रक्षाबंधनाचा सण. या दोन्ही सणांची माहिती चित्रांद्वारे देण्यात आली.

आपण आपल्या परिसरातील झाडांना राखी बांधून त्यांचेही रक्षण केले पाहिजे अशी संकल्पना मुलांना सांगण्यात आली.

पूर्व प्राथमिक विभागाच्या मुलांनी घरात उपलब्ध असलेल्या साहित्यातून शिक्षक व पालक यांच्या मार्गदर्शनातून सुंदर राख्या तयार केल्या.

**३० ऑगस्ट २०२१ – दहिहंडी**

कृष्णजन्म आणि दहिहंडी याबद्दलची एक गोष्ट मुलांना दाखवण्यात आली.

मुलींनी राधा, तर मुलांनी कृष्णाची वेशभूषा परिधान केली होती.

नर्सरी ज्यूनियर व सिनीयरच्या मुलांना दहिहंडीचे चित्र रंगवण्यासाठी देण्यात आले होते.

**६ सप्टेंबर २०२१ – पोळा / मातृदिन**

श्रावण अमावस्येला 'पोळा' हा सण साजरा केला

जातो. या दिवशी शेतकऱ्याला मदत करणाऱ्या बैलाची पूजा केली जाते. त्याला पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जातो. हा दिवस मातृदिन म्हणून सुद्धा साजरा केला जातो.

**८ सप्टेंबर २०२१ – गणपती**

१० सप्टेंबर पासून सर्वत्र साजरा होणारा गणेश उत्सव आम्ही ८ सप्टेंबरला शाळेच्या तासिकांमधे साजरा केला.

गणेश जन्माची कथा मुलांना दाखवली. गणपतीचे मखर, मूर्ती सजावट, तसेच विसर्जन पर्यावरणपूरक कसे करावे या विषयी शिक्षकांनी मुलांना माहिती दिली.

गणपतीचे श्लोक, स्तोत्र म्हणून मुलांनी तासिकेची सुरवात केली. शाळेत हा उत्सव कसा साजरा केला जातो याची माहिती चित्रांद्वारे मुलांना देण्यात आली.

नर्सरी व ज्यूनियरच्या मुलांनी चिकणमातीचा (Clay) मोदक, तर सिनीयरच्या मुलांनी गणपती तयार केला. ज्यूनियरच्या मुलांनी गणपतीचे चित्र चित्रकला वहीत चिकटवून बाजूला रंगीत खडूने सजावट केली तर सिनीयरच्या मुलांनी गणपतीची सुंदर चित्रे वहीत काढली.

**पालक सभा – शनिवार १८ सप्टेंबर**

नर्सरी व ज्यूनियर के. जी. : सकाळी १०:३० वाजता

सिनियर के. जी. : दुपारी १२:०० वाजता

या सत्रातील दुसऱ्या (ऑनलाईन) पालक सभेचे आयोजन शनिवार १८ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. ऑक्टोबर महिन्यात घेतल्या जाणाऱ्या निरीक्षणासंबंधी (observation) पालकांना सविस्तर माहिती देण्यात आली. पालकांचे शंकानिरसन करून त्यांच्या सहकार्याबद्दल शिक्षकांनी आभार व्यक्त केले.

या महिन्यांतही विविध विषयांच्या तासिकांना शिक्षकांनी विषयानुरूप चित्र चलचित्र (Video) चा उपयोग करून सर्व संकल्पना विद्यार्थ्यांना शिकवल्या. संगीताच्या तासिकेला सर्व सणांच्या अनुरूप गाणी शिक्षकांनी शिकवली. या सर्वांसोबत आठवड्यातून दोन वेळा परिपाठाच्या (Value education) अंतर्गत रस्त्यावर थुंकू नये, मोठ्यांचा आदर करावा, खोटे बोलू नये, अशा गोष्टी मुलांना सांगितल्या जातात.

ऑनलाईन शिक्षण प्रभावी करण्यासाठी सर्वच शिक्षक सर्वतोपरी प्रयत्नशील असतात. शाळेत घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचे फोटो संस्थेच्या वेबसाईटवर वेळीवेळी पाठवले जातात.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**हिंदी दिवस : १४ सप्टेंबर २०२१**

१४ सप्टेंबर हा दिवस 'हिंदी दिवस' म्हणून साजरा केला जातो. या वर्षी आम्ही हा दिवस 'ऑनलाईन' माध्यमाने साजरा केला. हा दिवस गणेशोत्सवाच्या दरम्यान आल्यामुळे आमचा विषय 'सर्वशक्तिमान गणपती' असा होता. या कार्यक्रमामध्ये इयत्ता पाचवी ते दहावी मधील विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

सदर कार्यक्रमाची सुरुवात गणपती बाप्पाच्या प्रार्थनेने झाली व त्यानंतर विद्यार्थ्यांनी बनविलेल्या गणपती बाप्पांच्या चित्रफिती दाखविण्यात आल्या, ज्यांचे विषय होते, हिंदी दिवसाचे महत्त्व, बाप्पांच्या आयुधांचे महत्त्व, नावांचे महत्त्व, तसेच गणेश पुजनात वापरण्यात येणाऱ्या विविध पत्रींचे महत्त्व, परदेशात साजरा होणारा गणेशोत्सव आणि प्रदूषण मुक्त गणेशोत्सव.

कार्यक्रमाची सांगता गणपतीच्या आरतीने झाली. सर्व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचा आस्वाद घेतला व त्यांना हा कार्यक्रम माहितीपूर्ण व मनोरंजक वाटला.

**लायन्स क्लब आयोजित पीस पोस्टर व वक्तृत्व स्पर्धेचा निकाल (२०२१-२०२२)**

| स्पर्धेचे नाव | विद्यार्थ्यांचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|
| पीस पोस्टर स्पर्धा | वेदांग डांगे | द्वितीय |
| वक्तृत्व स्पर्धा (इंग्रजी) | गौतमी सहस्रबुद्धे | द्वितीय |
| वक्तृत्व स्पर्धा (मराठी) | यशश्री दाभोलकर | द्वितीय |
| वक्तृत्व स्पर्धा (मराठी) | तनया शिंदे | तृतीय |

मराठी व इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी दुसरा क्रमांक पटकावल्याने शाळेला चषक मिळाला.

सर्व यशस्वी स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन !

**स्पेल बी आतंरराष्ट्रीय परीक्षा निकाल २०२१-२०२२**

सौ. ए. के. जोशी शाळेच्या इयत्ता ७ वीच्या तन्वी मेधुरवार हिने प्रथम स्तरामध्ये १०० गुण प्राप्त केले, या तिच्या यशाबाबत तिचा 'आंतरशालेय परीक्षेत प्रथम' असा पारितोषिक देऊन गौरव करण्यात येणार आहे.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

**कंपनीची प्रगती त्याच्या संशोधन व नवनिर्मिती करण्याच्या क्षमतेवर अवलंबून आहे : सी.ए. जय छैरा**

८ सप्टेंबर २०२१ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाच्या लेखा विभागाने WICASA ठाणे शाखेच्या सहकार्याने ''इनोव्हेट ऑर इव्हापोरेट'' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन केले होते. सी.ए. जय छैरा (आयसीएआयच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष) हे प्रमुख वक्ते होते. सी.ए. रजनीश शर्मा (ठाणे WICASA शाखेचे अध्यक्ष) उपस्थित होते.

विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर आणि प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली ऑनलाइन व्यासपीठाद्वारे कोविड प्रोटोकॉलचे पालन करून संपूर्ण सत्र आयोजित करण्यात आले होते. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर म्हणाले की, या स्पर्धात्मक युगात कल्पकता ही यशाची गुरुकिल्ली आहे. त्यानिमित्ताने महाविद्यालयाच्यावतीने अशा सृजनात्मक कार्यक्रमांचा विद्यार्थ्यांना नक्कीच फायदा होईल.

सुरुवातीला लेखा विभाग प्रमुख सी.ए. प्रा. योगेश प्रसादे यांनी व्यवसायातील नावीन्यपूर्ण विषयावर असे व्याख्यान देण्यामागील उद्दीष्टे स्पष्ट केली आणि मानवी जीवनात आणि समाजातही नावीन्य किती महत्त्वाचे आहे यावर प्रकाश टाकला.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे यांनी व महाविद्यालयाच्यावतीने प्रमुख वक्त्यांचे स्वागत केले.

कार्यक्रमासाठी उपस्थित मुख्य वक्ते सी.ए. जय छैरा यांनी Innovate or Evaporate या विषयावर अमूल्य मार्गदर्शन केले.

आपल्या भाषणाची सुरुवात करताना त्यांनी आजच्या व्यवसायाची तुलना साप आणि शिडीच्या खेळाशी केली. कारण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झपाट्याने होणारे बदल केवळ रोजच नव्हे तर अगदी एका मिनिटाला होत आहेत आणि कॉर्पोरेट जगात आज अटीतटीची स्पर्धा पाहिली जाऊ शकते. स्पष्टीकरण देताना त्यांनी काही कंपन्यांचे उदाहरण दिले जे फॉर्च्युन ५०० कंपन्यांच्या यादीत होते. ते संशोधनात अपयशी ठरले म्हणून ते दीर्घकाळ टिकू शकले नाहीत.

फळाच्या अपेक्षेत सुख-दुःखाचे बंधन असते.

नावीन्यपूर्णतेची काही उत्तम उदाहरणे देताना त्यांनी विशेषतः ऍपल कंपनीच्या नवकल्पनांवर प्रकाश टाकला, जिथे कंपनीने प्रतिस्पर्ध्यांपेक्षा काही नावीन्यपूर्ण वैशिष्ट्ये प्रदान केली. उदा. व्हॉइस बटण ठेवण्याऐवजी iPod मध्ये व्हॉल्यूम टच, डेअरी मिल्क टॅगलाईन आणि नावीन्यपूर्ण पॅकेजिंगने कंपनीची संपूर्ण विक्री आणि महसूल कसा बदलला इ. त्यांनी अल्प आणि दीर्घ कालावधीत नावीन्यपूर्णतेचे महत्त्व सांगून लाँग रन वर लक्ष केंद्रित केले.

व्यवसायाच्या क्षेत्रात समज किती महत्त्वाची आहे हे देखील सूचित केले. त्यांनी सांगितले की, खर्च कमी करणे आणि महसूल वाढवणे हे कंपनीचे एकमेव लक्ष्य आणि ध्येय नसावे. परंतु त्यापेक्षा अधिक कंपनीने ग्राहकांची मानसिकता समजून घेण्यात गुंतले पाहिजे आणि त्यानुसार नवकल्पना आणली पाहिजे. एक उदाहरण दिले की, झूम ऑनलाईन व्हिडिओ कॉलिंग ॲप स्वतःच एअरलाईन बाजारावर प्रभाव कसा टाकतो, कारण त्याने बहुतेक ठिकाण किंवा ऑफलाइन व्यवसाय बैठकांची जागा घेतली.

या अर्थाने त्यांनी सोशल मीडियाच्या क्षेत्रातील नावीन्यपूर्णतेचेही कौतुक केले आणि काही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या अपयशामागील कारणांचे विश्लेषण केले जे पूर्वी जनतेस आकर्षित करीत.

केवळ सोशल मीडियाच नाही तर क्रीडा हे आणखी एक महत्त्वाचे क्षेत्र आहे जिथे नावीन्य आले आहे. त्यांनी रणजी ट्रॉफी आणि आयपीएलच्या तुलनात्मक लोकप्रियतेमागील कारणांचा शोध घेतला.

त्यांनी सांगितले की, ज्ञान खूप महत्त्वाचे आहे. ते नावीन्यासह असणे आवश्यक आहे आणि प्रतिस्पर्ध्यांच्या पलीकडे गेले पाहिजे. धारणा (perception) व्यवसायात महत्त्वाची भूमिका बजावते आणि किंमतीवर देखील परिणाम करते.

आपल्या सत्राचा समारोप करताना ते म्हणाले की, व्यवसाय आणि कॉर्पोरेट जगताच्या बाबतीत नावीन्यता फक्त दोन विभागांमध्ये विभागली गेली आहे. आणि ते दोन विभाग आयडिया (कल्पना) आणि एक्झिक्युशन (अंमलबजावणी) आहेत जिथे १% तुमची कल्पना आहे आणि ९९% तुमची अंमलबजावणी आहे.

त्वरित अंमलबजावणीसह नवीन कल्पना एका महान नावीन्यतेला जन्म देते जे नफ्यात योगदान देईल, तसेच दीर्घकाळ टिकून राहण्यास मदत करेल.

सत्र प्रश्नोत्तर फेरीने संपले. जेथे विद्यार्थ्यांना त्यांचे प्रश्न विचारण्याची संधी मिळाली. संवादाच्या उत्तम कौशल्याने हे सत्र विद्यार्थ्यांसाठी मंत्रमुग्ध करणारा अनुभव बनले. याप्रसंगी सी.ए. रजनीश शर्मा (ठाणे शाखा WICASA अध्यक्ष) यांनी त्यांचे मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, डॉ. प्रियंवदा टोकेकर, डॉ. महेश पाटील, ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे, लेखा विभागातील प्रा. वाढविंदे, प्रा. राऊत, प्रा. दीप्ती पाटील व अनेक विद्यार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते.

प्रा. सी.ए. मधुरा जोशी यांनी संपूर्ण सत्राचे सूत्रसंचालन केले. २०० पेक्षा जास्त विद्यार्थी आणि शिक्षकांनी त्याचा लाभ घेतला.

कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

**नवीन पिढीकडून शिकायला आवडते – सचिन पिळगांवकर**

विद्या प्रसारक मंडळाचे के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त) ठाणे, आयोजित डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे एकतिसावे पुष्प दिनांक २४ सप्टेंबर २०२१ रोजी सुप्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक, गायक, निर्माता सचिन पिळगावकर

या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाने 'हाच माझा मार्ग' या विषयावर ऑनलाईन स्वरूपात गुंफले.



डॉ. वा. ना. बेडेकर व्याख्यानमालेची सुरुवात करताना प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी सचिनजींच्या व्यक्तिमत्त्वाविषयी ओळख करून देत केली. सचिन पिळगावकर यांच्या अगदी सुरुवातीच्या 'हा माझा मार्ग एकला' या चित्रपटाच्या आठवणींनी गप्पांना सुरुवात झाली. त्यांनी बाल-कलाकार म्हणून केलेल्या साठहून अधिक चित्रपटांचा प्रवास ते बालिका वधू, नदीया के पार, अखियोंके झरोकोसे, गीत गाता चल अशा विविध चित्रपटातील त्यांच्या मुख्य भूमिकांबद्दलचे अनुभव सांगितले.

'अशी ही बनवाबनवी' या मराठीतील सुपरहिट चित्रपटाला ३३ वर्षे झाली, या निमित्ताने सचिन पिळगावकर यांनी चित्रपटाच्या अनेक आठवणी ताज्या केल्या. लक्ष्मीकांत बेर्डे, अशोक सराफ आणि इतर सर्व कलाकारांसोबतचा काम करण्याचा अनुभव व त्यातील गंमतीजमती त्यांनी सांगितल्या. चित्रपटातील बालगंधर्वांचा उल्लेख करण्यामागचा हेतू स्पष्ट केला.

त्यांच्या संगीत कारकिर्दीबद्दल सांगताना गायनाची सुरुवात ते त्यांनी गायलेल्या गाण्यांविषयी अनुभव सांगितले. टीव्हीवरील सचिनजींनी केलेल्या विविध मालिकांच्या दिग्दर्शनाच्या अनुभवांबद्दल त्यांनी चर्चा केली.

ओटीटी प्लॅटफॉर्मवरचे वाढते पर्व आणि बदलांविषयी बोलताना त्यांनी change is permanent असे म्हणत त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत झालेल्या विविध बदलांविषयी सांगितले. सिनेमासृष्टीत करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सचिनजींनी आधी विविध तज्ज्ञ मंडळींच्या हाताखाली काम करून विविध तंत्र, सिनेमा शैली, नवीन बदल, अभिनय करण्याच्या पद्धती शिकून घ्या आणि मग स्वतंत्रपणे कार्य करा असे सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोतरे झाली. सचिनजींचा प्रवास हा येऊ घातलेल्या सिनेमा क्षेत्रात काम करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन करणारा होता. त्यामुळे सचिनजींना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे अनेक प्रश्न विचारले.

या व्याख्यानाचे आयोजन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमाला उपप्राचार्य सुभाष शिंदे, डॉ. प्रियंवदा टोकेकर, प्रा. संगीता दीक्षित, ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे, सर्व प्राध्यापक हे गुगल मीट अँपद्वारे सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व सचिन पिळगांवकर यांची दिलखुलास मुलाखत प्रा. मानसी जंगम यांनी घेतली. कार्यक्रमाचे संयोजन उप-प्राचार्य डॉ. महेश पाटील यांनी केले, तर तांत्रिक बाजू महेश दूधभाते यांनी सांभाळली. व्याख्यानाची सांगता पसायदानाने झाली.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

### डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला

वनस्पती शास्त्र विभागातर्फे डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाले अंतर्गत ४ सप्टेंबर, २०२१ रोजी "Plant Based Culture and Products vis-a-vis Pro Ecological Economy" या विषयावर व्याख्यान

आयोजित केले होते. डॉ. सुचंद्र दत्ता, सहाय्यक प्राध्यापक, वनस्पतिशास्त्र विभाग, आर.डी. आणि एस.एच. नॅशनल कॉलेज, वांद्रे यांनी यावेळी मार्गदर्शन केले. त्यांच्या व्याख्यानात त्यांनी धार्मिक महत्त्व असलेल्या आणि औषधी वनस्पतींवर मौल्यवान माहिती सादर केली. विविध भारतीय उत्सव, जसे की गणेशोत्सव, गौरी-पूजन, दुर्गा-पूजा, दसरा, इत्यादी अशा विधींचा उद्देश औषधी वनस्पतींची ओळख करून देणे आहे. वनस्पती आधारित अर्थव्यवस्था व वनस्पती कलाकृतींच्या उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक व्यवहार्य उपाय त्यानी सुचवले. सर्वांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारणे गरजेचे आहे असे त्यांनी आवर्जून नमूद केले. या कार्यक्रमाला १८ विद्यार्थी व १० शिक्षकांनी आपला सहभाग नोंदवला.



**जीविका क्लबचे उद्‌घाटन**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून जैव रसायनशास्त्र विभागाच्या जीविका क्लबचे उदघाटन ४ सप्टेंबर २०२१ रोजी ऑनलाईन पद्धतीने संपन्न झाले. या वेळी डॉ. उत्कर्ष, लेखक, सहाय्यक प्राध्यापक, जैव रसायनशास्त्र डॉ. होमी भाभा विद्यापीठ यांचे "Microbial Bioremediation" या विषयावर मार्गदर्शन लाभले. डॉ उत्कर्ष यांनी Bioremediation ही संकल्पना समजावून सांगितली. Bioremediation या क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच त्याच्या संशोधनांबाबत चर्चा केली. या सत्राला ३९ विद्यार्थी उपस्थित होते.



**जिमखाना समिती**

जिमखाना समितीचे उद्घाटन २९ सप्टेंबर २०२१ रोजी ऑनलाईन पद्धतीने संपन्न झाले. यावेळी श्री. पार्श गाला, बुद्धिबळपटू हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. यावेळी त्यांनी बुद्धिबळाचे मूलभूत नियम, तसेच बुद्धिबळातील विविध चाली व बुद्धिबळ कसे खेळावे यावर खेळकरपणे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला ७१ विद्यार्थी व १२ शिक्षकांनी आपला सहभाग नोंदवला.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

१७ सप्टेंबर २०२१ : विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाची 'मार्गदर्शक संस्था' म्हणून निवड करण्यात आली. हा उपक्रम MHRD / AICTE यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला आहे. या कार्यक्रमानुसार विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन इतर ५ AICTE मान्यता प्राप्त संस्थाना मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे. विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाला भारतातील निवडक ५० तंत्रनिकेतनांपैकी ही विशेष श्रेणी प्राप्त झाली आहे. MHRD / AICTE या प्रकल्पाला २ लाखांचे अनुदान IIC 4.0 मध्ये देण्यात येणार आहे.

### ISTE महाराष्ट्र-गोवा विभाग पुरस्कार २०२०

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाची ही विशेष आनंदाची बातमी आहे; सन २०२०चा "Best Student Chapter (Polytechnic)" चा पुरस्कार विद्या प्रसारक ISTE Student विभागाला मिळाला आहे. सदर पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम वाय. बी. चव्हाण सेंटर, नरिमन पॉईंट, मुंबई येथे ५/१०/२०२१ रोजी संपन्न झाला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे (ISTE) इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन या संस्थेच्या ५० व्या वार्षिक अधिवेशनात पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदर कार्यक्रमात इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन नवी दिल्लीचे अध्यक्ष प्रतापसिंह देसाई, संस्थेचे विजय वैद्य, प्रा. बी. आर. शर्मा व अनेक मान्यवर उपस्थित होते.




### गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रम

### अहवाल

संस्थेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारामुळे विद्यार्थी आणि सर्व शिक्षकांना शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी प्रेरणा मिळते. पुरस्कार विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करतात आणि स्पर्धात्मक भावना वाढवतात. म्हणूनच व्हीपी एम पॉलिटेक्निक दरवर्षी MSBTE परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करते.

गुरुवार, ३० सप्टेंबर २०२१ रोजी, Audio-Visual मधील सत्कार कार्यक्रमामध्ये यंदाच्या MSBTE परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या यशवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

विद्यार्थ्यांना बक्षिसे मिळणे हा भावनिक आणि आनंदाचा क्षण होता. संस्थेतील सर्व गुणवंत विद्यार्थी त्यांच्या पालकांसह समारंभात सहभागी झाले.

सत्कार कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता श्रीमती पूजा पवार यांच्या हार्दिक स्वागताने झाली.

श्री. तुषार मोहिते-पाटील यांनी सर्व गुणवंत विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचे स्वागत व अभिनंदन केले. कोविड महामारीच्या प्रतिकूल परिस्थितीतही परीक्षांमध्ये यश मिळविल्याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे आणि यशाचे कौतुक केले.

प्राचार्य डॉ. डी. के. नायक यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे स्वागत व अभिनंदन केले आणि संस्थेच्या महत्त्वपूर्ण कामगिरीवर प्रकाश टाकला. आपल्या संबोधनात ते म्हणाले की, कोविड-१९ संकटाचा शिक्षण व्यवस्थेवर कसा परिणाम झाला आणि आम्हाला वर्गशिक्षणातून व्हर्च्युअल अध्यापन शिक्षण पद्धतीकडे वळण्यास भाग पाडले. ऑनलाइन MSBTE गुणवत्ता यादीत अव्वल स्थान मिळवल्याबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांच्या भावी योजनांसाठी त्यांना आशीर्वाद दिले आणि शिक्षकांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

यशवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे आणि प्रमाणपत्र देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. यावेळी सर्व विभाग प्रमुख व प्राचार्यांनी पुनश्च विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या अखेरीस काही यशवंत विद्यार्थ्यांनी त्यांच्या मनोगतात पालक आणि शिक्षकांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**Course wise Toppers List of MSBTE Examination Summer 2021**

| Course | Rank | Student Name | Percentage (%) |
|---|---|---|---|
| **First Year** | | | |
| FYCO | 1 | Borkar Vaishnavi Shirish | 96.27 |
| | 2 | Tiwad Sarthak Pravin | 95.47 |
| FYEP | 1 | Surve Samarthya Vilas | 86.67 |
| | 2 | Vengurlekar Sarvesh Udaykumar | 85 |
| FYIE | 1 | Dhure Tejas Vilas | 90.48 |
| | 2 | Shelar Dnyaneshwar Dattatray | 88.14 |
| FYIF | 1 | Jindani Nayaab Asif | 93.67 |
| | 2 | Raje Chinmay Ramesh | 92.87 |
| FYIS | 1 | Gholap Neha Mahadev | 84.33 |
| | 2 | Jejurkar Tejal Rajendra | 83.60 |
| **Second Year** | | | |
| SYCO | 1 | Raje Aryan Girish | 99.40 |
| | 2 | Raje Arya Girish | 99.2 |
| SYEP | 1 | Qadri Tabin Tareq | 93.16 |
| | 2 | Shaikh Aslam Ahmed Hussain | 92 |
| SYIE | 1 | Damodar Sai Rajesh | 89.35 |
| | 2 | Dhalkari Vivek Santosh | 89.23 |
| SYIF | 1 | Narkar Aditi Vikas | 97.69 |
| | 2 | Bhoi Siddhant Navnath | 97.31 |
| SYIS | 1 | Avhad Shreyash Vasant | 93.42 |
| | 2 | Bapat Kasturi Vinod | 89.48 |
| **Third Year** | | | |
| TYCO | 1 | Shinde Tejashree Satish | 99.37 |
| | 2 | Revankar Siddharth Mahendra | 98.46 |
| | 3 | Renghe Prathamesh Sunil | 98.29 |
| | 4 | Karande Adarsh Arun | 98 |
| TYEP | 1 | Bargode Atharva Santosh | 93.5 |
| | 2 | Pise Madhuri Shivaji | 92.5 |
| TYIE | 1 | Shelar Sakshi Dattatray | 93.6 |
| | 2 | Kerkar Pranit Vijay | 93.43 |
| TYIF | 1 | Deshpande Sampada Sanjay | 98.75 |
| | 2 | Devare Ishika Sanjay | 97.13 |
| TYIS | 1 | Jain Samyak Chandraprakash | 96.83 |
| | 2 | Lad Ritik Nilesh | 93.28 |
| **Advance Diploma Programmes** | | | |
| CP | 1 | Subuddi Kirankumar Ramarao | 91.79 |
| | 2 | Gavas Mahadev Vishnu | 90.93 |
| IT | 1 | Solanki Neelam Pravin | 97.55 |
| | 2 | Punpale Dattaprasad Govindprasad | 97 |
| | 3 | Akash Srivastava | 96.91 |
| | 4 | Kshitij Kumar Singh | 96.73 |
| ER | 1 | Soj Walter Menvel | 89.41 |
| | 2 | Shinde Ganpat Barku | 88.89 |



इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी विभागाचे गुणवंत विद्यार्थी



प्रथम वर्ष डिप्लोमाचे गुणवंत विद्यार्थी



इन्स्ट्रूमेंटेशन विभागाचे गुणवंत विद्यार्थी



कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाचे गुणवंत विद्यार्थी



इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम विभागाचे गुणवंत विद्यार्थी



ॲडवान्स डिप्लोमा कोर्सेसचे गुणवंत विद्यार्थी



इंडस्ट्रिअल इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे गुणवंत विद्यार्थी

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**सप्टेंबर २०२१ मधील कार्यक्रम / वार्ता**

३ सप्टेंबर : प्रा. कृणाल के. पुंजानी आणि प्रा. कला महादेवन यांचा 'ट्रान्सिशनिंग टू ऑनलाईन लर्निंग इन हायर एज्युकेशन : इन्फ्लुएन्स ऑफ अवेअरनेस ऑफ कोविड १९ अँड सेल्फ-एफिकसी ऑन पर्सीव्हड नेट

बेनिफिट्स अँड इंटेन्शन' हा शोधनिबंध स्कोपस अनुक्रमित एज्युकेशन अँड इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीज – या IFIP टेक्निकल कमिटी ऑफ एज्युकेशनच्या अधिकृत नियतकालिकामध्ये प्रकाशित झाला.

४ सप्टेंबर : प्रा. कृणाल के. पुंजानी यांना एशियन जर्नल ऑफ मॅनेजमेंट केसेस – स्कोपस इंडेक्स्ड आणि एबीडीसी अनुक्रमित नियतकालिका तर्फे समीक्षक म्हणून आमंत्रित केले गेले आणि त्यांनी यशस्वीरित्या समीक्षा कार्य पूर्ण केले.

५ सप्टेंबर : डॉ. स्मिता जपे, श्री. वैभव पंडित आणि सौ. दीप्ती गोखले यांनी शिक्षक दिनाच्या पूर्वसंध्येला शिक्षक दिन सत्कार समारंभ आयोजित केला. सर्व शिक्षक आणि सहाय्यक कर्मचारी सदस्यांचा या कार्यक्रमात व्यवस्थापनातर्फे सत्कार करण्यात आला.



६ सप्टेंबर : डॉ. स्मिता जपे यांनी COSIA (CHAMBER OF SMALL INDUSTRY ASSOCIATIONS) सदस्यांशी उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्राचे परस्पर संबंध आणि सामंजस्य करार यासाठी समन्वय साधला. COSIA (CHAMBER OF SMALL INDUSTRY ASSOCIATIONS) सदस्यांसह उद्योग अकादमीच्या या परस्परसंवाद बैठकीला डॉ. नीतिन जोशी, डॉ. स्मिता जपे, डॉ. कंचन अक्षय, प्रा. विभूती सावे आणि प्रा. महेश भानुशाली उपस्थित होते.



७ सप्टेंबर : प्रथम वर्ष एमएमएसचे विद्यार्थी, हृषिकेश पार्टे, पियुषा कामतेकर आणि सुमेधा सावंत यांनी प्रा.सिद्धेश सोमण यांच्या मार्गदर्शनाखाली, IMCOST येथे आंतरमहाविद्यालयीन सामाजिक उद्योजकता योजना (सोशल एंटरप्रेनिअरशीप बिसनेस प्लॅन) स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. विविध संस्थांचे ११ संघ या स्पर्धेत सहभागी होते आणि आमचा संघ पहिल्या क्रमांकावर होता व परीक्षकांनी देखील त्यांच्या व्यावहारिक दृष्टिकोनाचे कौतुक केले.



**हृषिकेश पार्टे**



**पियुषा कामतेकर**



**सुमेधा सावंत**

११ – १४ सप्टेंबर : डॉ. स्मिता जपे यांना इंडियन जर्नल ऑफ फायनान्स अँड बँकिंग, एबीडीसी अनुक्रमित नियतकालिका तर्फे समीक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले व त्यांनी शोधनिबंधाचे समीक्षा कार्य यशस्वीरित्या पूर्ण केले.

१५ सप्टेंबर : डॉ. नीतिन जोशी, SRBS च्या संचालक निवडीसाठी मुलाखत समिती सदस्य म्हणून सहभागी झाले.

१५ सप्टेंबर : डॉ. नीतिन जोशी यांना आनंद भारती संस्थे तर्फे पारितोषिक वितरण समारंभासाठी पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले.

१७ सप्टेंबर : प्रा. दिप्ती पेरिवाल यांनी डॉ. व्ही. एन. ब्रिम्स आणि कॅनेडियन टेक्निकल आणि मॅनेजमेंट कॉलेज, कॅनडा या दोघांतील सामंजस्य करारासाठी समन्वयन केले.

१८ सप्टेंबर : ब्रिम्स आयआयसी समिती तर्फे विद्यार्थी समन्वयकांसह ब्रिम्स इनोव्हेटर्स-बिझनेस प्लॅन आयडियाज या स्पर्धेचे अंतिम सादरीकरण आयोजित केले, ज्याचे मूल्यांकन ८ उद्योजक परीक्षकांनी केले.


१८ सप्टेंबर : यशस्वी प्रयत्नानंतर डॉ. कांचन अक्षय यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यांच्या प्रबंधाला मुंबई विद्यापीठातर्फे संमती मिळाली व डॉक्टरेट पदवी देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.




२० सप्टेंबर : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय उद्योजकता आव्हान (एनईसी) स्पर्धेचे प्रारंभिक स्तर यशस्वीरित्या पूर्ण केले आणि ई-सेल आयआयटी बॉम्बे तर्फे आयोजित उपांत्य फेरीपर्यंत पोहोचले.




२५ सप्टेंबर : नालाको पंचपतमली बॉक्साईट खाणी उद्योग संस्थेतर्फे आयोजित प्रमुख घटक बैठकीला त्यांच्या उच्च आणि मध्यम व्यवस्थापनातील अधिकाऱ्यांसह  डॉ. स्मिता जपे उपस्थित राहिल्या.



२८ सप्टेंबर : इंटर्नशिप प्रकल्पासाठी COSIA (CHAMBER OF SMALL INDUSTRY ASSOCIATIONS) सह बैठकीला डॉ. स्मिता जपे उपस्थित राहिल्या.



Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.